
# अमृत कुंभ



वर्ष १७ | अंक २ | जून - जुलै २०२३ | मूल्य रु. १४/-




ज्ञानसरोवर, माउंट आबू : माळी समाज सुसंवाद प्रबोधन मेळाव्यात ब्र.कु. दिलीप यांचा गौरव करताना अध्यक्ष भ्राता अनिल मगरे, उपाध्यक्ष भ्राता विजय शेंडे



रविवार पेठ, पुणे : जागतिक सुरक्षा सप्ताह निमित्त प्रादेशिक परिवहन उपअधीक्षक भ्राता संजीव भोर यांना ईश्वरी भेटवस्तू देताना ब्र.कु. रोहिणी



गोराई, बोरीवली : मुलांच्या समर कॅम्पमध्ये ग्रुप फोटोत ब्र.कु. पारुल, ब्र.कु. कविता, प्रोफेसर भ्राता दिनेश यादव व उपस्थित मुले




आरमोरी, चंद्रपूर : ''नशा मुक्त भारत'' कार्यक्रमात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना संबोधताना ब्र.कु. डॉ. सचिन परब, ब्र.कु. कुंदा, शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा सुनीताताई वनमाळी व प्राचार्य भ्राता डॉ. लालसिंग खालसा



अकोला : डॉक्टरांसाठी आयोजित सेमिनारमध्ये ग्रुप फोटोत उपस्थित डॉक्टर्स व ब्र.कु. रुक्मिणी




शेगाव : द.भ.प. केवळ भारती महाराज यांना भेटवस्तू देताना ब्र.कु. शारदा

परमपिता परमात्मा त्रिमूर्ती शिवभगवानुवाच 'मन्मनाभव'।

# अमृतकुंभ

## अंतरंग

वर्ष १७, अंक २. जून – जुलै २०२३




१. संपादकीय – खरा विद्यार्थी कसा असावा ? २
२. आठवणींच्या हिंदोळ्यावर ... ! ४
३. कर्मगती ५
४. प्रकाशवाटा (भाग – ४) ६
५. मन नेहमी प्रसन्न असे ठेवाल ७
६. यज्ञाच्या प्रथम पूजनीय आधारशीला... ९
७. तू माझा सांगाती १२
८. "शिवबाबा : माझा पाठीराखा" (भाग – ३) १३
९. मी पाहिलेली मितभाषी महान विभूती १४
१०. प्रश्नोत्तरे (भाग – २) १५
११. यज्ञेतिहासाची पाने चाळताना... १७
१२. निर्विघ्न बनण्यासाठी लवलीन अवस्थेमध्ये रहा १८
१३. परीकथा (भाग – ९) २०
१४. तणावमुक्त रहा २३
१५. बकुळफुले २४
१६. पसायदान (भाग – २) २५
१७ गरजा कमी करा २६
१८ चिंतन २७
१९ आम्हा प्रेरणा बाबांची (कविता) २८


## मुखपृष्ठाविषयी

आपल्या जीवनावर ठसा उमटवणाऱ्या व्यक्तींना विसरणे अशक्य असते. जे आपल्याला काही ना काही देऊन जातात ते आयुष्यभर आठवणीत राहतात. साकार बाबा म्हणजेच ब्रह्माबाबा आणि मातेश्वरी जगदंबा यांची स्मृती ब्रह्माकुमारी संस्थेच्या विद्यार्थ्यांसाठी एक अमोल ठेवा आहे. हा 'ठेवा' अक्षय आहे. कधी मन उदास होतंय असं वाटलं तर आठवणींच्या झोक्यांवर अलगद मन झुलवावं आणि काही क्षणात ते प्रफुल्लित व्हावं याचा प्रत्यय येतो. जून महिना म्हटल्यावर मातेश्वरींच्या आठवणींचे आल्हाददायक झोके मनाला उभारी देतात.

– प्रकाशिका


**फोटो, लेख इत्यादी पाठविण्याचा पत्ता :**
संपादक – अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्
ए–१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व)–४००६०३
फोन : ०२२–२५३२२२०८
E-mail : info@amrutkumbh.com

**वर्गणी पाठविण्याचा पत्ता :**
ब्र. कु. गोदावरी, प्रकाशक अमृतकुंभ
द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए–१०, वर्षा अपार्टमेंट,
छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी,
ठाणे (पूर्व) – ४००६०३ मोबाईल : ९८२००२३०९२

Printed, published by B.K.Godavari on behalf of Prajapita Brahmakumaris Ishwariya Vishwa Vidyalaya. Printed at Perfect Prints, 22, Jyoti Industrial Estate, Nooribaba Dargah Road, Near Makhmali Talao, Thane (west), pin 400601. Published at Prajapita Brahmakumaris Light House, Wagle Estate, Thane (west), Pin - 400604, Maharashtra. Editor : Mr. Sachin Vinayak Upadhye.

वार्षिक वर्गणी रु. ८५/–, आजीव सभासद वर्गणी रु. १,५००/–, एका अंकाचे रु. १४/–
E-magazine साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या – www.amrutkumbh.com.



संपादकीय ...

# खरा विद्यार्थी कसा असावा ?

संस्कृतात अनेक जीवनोपयोगी सुभाषिते आहेत. त्यातील एकाच्या आधारे खरा किंवा चांगला विद्यार्थी कसा असावा ते पाहू या.

**काकचेष्टा बकध्यानं श्वाननिद्रा तथैव च ।**
**अल्पाहारी गृहत्यागी विद्यार्थी पंच लक्षणम् ।।**

पक्षांमध्ये कावळा हा सर्वात हुशार पक्षी मानला गेला आहे. पक्षिशास्त्रानुसार तर कावळा सफाई कामगारही मानला गेलाय. कावळ्याची बारीक नजर असते, अन्नपदार्थ मिळवताना. आपल्याला जे हवंय तेच मिळवण्याकरिता कावळा आवश्यक ते सर्व प्रयत्न करतो. कष्ट उपसताना आळशीपणा करत नाही. नेमका हाच गुण विद्यार्थ्यांनी कावळ्याकडून घ्यावा ही अपेक्षा आहे.

**बकध्यान** हे दुहेरी अर्थाने साहित्यात वापरले जाते. एखादा स्वार्थी माणूस आपल्या स्वार्थपूर्तीसाठी सगळी ऊर्जा पणाला लावतो आणि जे हवंय त्यावर डोळा ठेवून असतो तेव्हा त्याला बकध्यान म्हणजे बगळ्याप्रमाणे एकाग्र होणे म्हटले जाते. हेच विद्यार्थ्यांच्या बाबतीत मात्र आपल्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्यासाठी सुचविले आहे.

**श्वाननिद्रा** म्हणजे कुत्र्याची निद्रा अत्यंत सावध असते. जरा खुट्ट वाजलं तरी तो कान टवकारतो. त्याचा अर्थ आहे निद्रा, श्वानाच्या अधीन आहे; पण श्वान निद्रेच्या अधीन नाही. विद्यार्थी दशेत हे करणे म्हणजे आवश्यक तेवढीच झोप घेणे व उरलेला वेळ विद्याभ्यासात सत्कारणी लावणे.

**अल्पाहारी** – आपल्याकडे कुणाला जेवायला बोलावले की जेवण वाढताना 'सावकाश जेवा' म्हणण्याची पद्धत आहे. याचे दोन अर्थ आहेत. एक म्हणजे भराभरा, घास न चावता जेवू नका; पण रेंगाळतही जेवू नका. दुसरा अर्थ आहे, स + अवकाश म्हणजे पोटास तड लागेपर्यंत जेवू नका. थोडी जागा पोटात ठेवा जेणेकरून पचनास आवश्यक ती हालचाल करण्यास पोटातील स्नायूंना वाव मिळेल. ह्या दोन्ही अर्थांप्रमाणे जेवले तर, आपसूकच जेवढे आवश्यक तेवढेच खाल्ले जाते हा अनुभव आहे. म्हणजेच अल्पाहारी बनता येते. अल्पाहारीचा अर्थ उपासमारी नव्हे. ज्या जेवणामुळे झोप अनावर होते ते टाळण्याकरिता असे अल्पाहारी बनणे विद्यार्थ्यांच्या हिताचेच असते. आजकाल प्रचलित असणाऱ्या 'जंक फूड' पासून दूर राहणे केव्हाही चांगलेच हे वेगळे सांगायला नको.

**गृहत्यागी** – पूर्वीच्या काळी घरापासून लांब जाऊन शिक्षण घ्यावे लागत असे. गुरूगृही जाऊन शिक्षण घेण्याची प्रथा होती. हे करताना घरच्यांचा मोह दूर सारून जाण्याची तयारी असेल, तरच विद्यार्जन शक्य आहे असा सुभाषितकारांचा भाव होता.

कालानुसार थोडाफार बदल झाला तरी या पाच लक्षणांतील मूळभाव आजही लागू होतो. पण हे झाले लौकिकार्थाने मिळवण्याच्या शिक्षणाविषयी. आपण याला आध्यात्मिक अंगाने घ्यायचा प्रयत्न करून बघूया. ब्रह्माकुमारी संस्थेच्या नावातच विश्व विद्यालय शब्द येतात. संस्थेत येणारा प्रत्येक मनुष्य हा शेवटपर्यंत विद्यार्थी दशेतच राहतो. संस्थेतील विविध कार्य करताना पदभार काहीही असो; पण मनांत विद्यार्थी भाव प्रत्येकजण जपतो. परमेश्वर, परमशिक्षक आणि आपण त्याचे विद्यार्थी हे सुंदर नाते अनुभवण्याचा अभ्यास केला जातो. अशा अर्थाने वरील सुभाषितातील विद्यार्थीदशा कशी जोपासायची ते पाहू या.

**काक दृष्टी** – 'काऊला क्षते धुंडी' असे संतांनी लिहून ठेवले आहे. म्हणजे कावळ्याची दृष्टी न्यूनत्व कुठे आहे ते पाहते आणि त्याचा स्वत:साठी फायदा तो करून घेतो. आपल्याला आध्यात्मिक विद्यार्थी म्हणून जगताना दुसऱ्यातील अवगुण वा न्यून न पाहता स्वत:तील न्यून

पाहण्याकरिता सूक्ष्म दृष्टी ठेवायची आहे. अध्यात्माच्या वाटेवर काय त्याज्य आणि काय पूज्य ते निवडणे म्हणजे काकदृष्टी म्हणू या. जसे श्रीदत्तांनी चोवीस गुरू केल्याचे वर्णन आढळते. तसे कावळ्यासारख्या पक्षाकडून आपण हे घेणे म्हणजे श्रीदत्तांप्रमाणे आपणही त्याला गुरू केले असे म्हणता येईल. असे करणे म्हणजे श्री दत्तांना अनुसरणेच होय.

**बकध्यान** – सर्वसाधारणपणे साधकाची एक तक्रार असते. मन एकाग्र होत नाही. नेमके ध्यानाला बसले की मग नाही-नाही ते विचार येतात. एरव्ही ज्यांची आठवणही येत नाही त्या सगळ्यांची आठवण अशा वेळेस येते. 'भ्रमित मन वळेना हीत तें आकळेना' असे समर्थ रामदासांनी श्रीकरुणाष्टकात लिहून ठेवले ते प्रत्ययास येते. या स्थितीतून पुढे जाण्यासाठी देहबुद्धीचा विसर पडण्यासाठी उच्च आत्मभान म्हणजेच स्वमानाचा अभ्यास कामी येतो. या जगात वावरताना इतरांशी आपला संपर्क घडणारच; पण संपर्कात येताना आपण देह नसून आत्मा आहोत आणि आपल्या अवती भवतीही मनुष्यात्मे आहेत. देह तर नश्वर आहे असा अभ्यास म्हणजे बकध्यानातील एकाग्रता साधणे आहे. जसे बगळा विचलित न होता एका पायावर उभा राहतो तसे **बुद्धीरूपी नेत्र, भृकुटीच्या मध्यावर केंद्रित करणे म्हणजेच ध्यानमार्गात अग्रेसर होणे.**

**श्वाननिद्रा** – देहास आवश्यक तेवढी झोप ज्याने त्याने आपल्या दिनचर्येनुसार घ्यावी. प्रत्येकाच्या कामाचे स्वरूप, शारीरिक स्वास्थ्य आणि इतर बाबी व्यक्तिगत आहेत. पण ब्राह्ममुहूर्त कुठल्याही परिस्थितीत साधणे हे राजयोगाच्या विद्यार्थ्यांच्या जीवनाचे अविभाज्य अंग आहे. दिवसाची सुरुवात निराकार शिवाच्या आठवणीने झाल्यास दिवस चांगला जातो यात शंकाच नाही. नित्य अभ्यासाने हळूहळू झोप सत्त्वप्रधान बनू लागते आणि आपल्या स्वप्नांचा दर्जा सुधारला की समजावे झोपेचा दर्जा सुधारत चालला आहे. अन्यथा सहा-सात तास झोपूनही झोप पूर्ण झाल्याचे समाधान मिळत नसल्यास झोपेचा दर्जा उंचावण्याची गरज आहे असे जाणावे.

**अल्पाहारी** – वर उल्लेख केल्याप्रमाणे अन्नग्रहण करावे; पण त्याच्या जोडीला आपण ईश्वरी प्रसाद ग्रहण करत आहोत किंवा हे ब्रह्माभोजन ग्रहण करत आहोत ही स्मृती जागृत राहणे अत्यंत गरजेचे आहे. परमात्मा शिव म्हणतात, अशा स्मृतीद्वारे तुमचे अन्न, मनास सत्त्वप्रधान बनविण्यास सुरुवात करेल. म्हणतात ना ! जसे अन्न तसे मन. आजवर आपण 'वदनी कवळ घेता...' म्हणत आलो; पण हा ईश्वरी प्रसाद मी घेत आहे याची भावनेच्या पातळीवर स्मृती गरजेची आहे. तसे केल्यास आपसूकच भोजनातील रसात मन-बुद्धी न गुंतता ईश्वरी रसात गुंतेल आणि मग एकरस मनोवस्था गाठणे सुकर होईल. राजयोगाच्या साधनेत भोजनाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. यासोबत एक सूक्ष्म अभ्यास आपण जोडू शकतो. आपले विचार हे आपल्या बुद्धीचे अन्नच आहे. व्यर्थ विचार, नकारात्मक विचार म्हणजे अनारोग्यकारक अन्नासमान त्याज्य आहेत. तो आहार बंद करून शुद्ध विचारांच्या आहारावर लक्ष देणे हेच अल्पाहारी बनणे आहे. शुद्ध विचार शक्तीशाली असल्याकारणाने कमी विचार खर्च करून आपले विहित कार्य साधता येते. आध्यात्मिक विद्यार्थ्याचा हाच अल्पाहार आहे.

**गृहत्याग** – राजयोग साधनेत आपले राहते घर, कुटुंब-परिवार सोडण्याची गरजच नाही. शरीर हे आत्म्याचे जणू घरच आहे. या घराच्या भानापासून दूर जाणे म्हणजेच स्वतःला आत्मा समजणे, मी निराकार शिवपित्याची संतान आहे हे समजणे म्हणजे जणू गृहत्याग आहे. या पुढील पायरी म्हणजेच गुरुगृही जाणे. परमात्मा शिव आपला पिता आहे तसेच तो आपला सद्‌गुरुही आहे. त्याचे निवासस्थान म्हणजे परमधाम अथवा शांतीधाम. मन-बुद्धीने त्या परमधामी वारंवार जाणे म्हणजे सद्‌गुरुगृही निवासच नाही का ! आणि जो सद्‌गुरूच्या निकट राहतो त्याला गती आणि सद्‌गती हमखास मिळणारच. **शांतीधामच्या स्मृतीने संस्कार परिवर्तनाची प्रक्रिया वेग धरते.** अशा प्रकारे विद्यार्थी लक्षणांचा आपण नुसता अर्थ न लावता तसे जगण्याचा, अंगी बाळगण्याचा प्रयत्न करू या, त्यातून आपली मनोवांछित उंची गाठता येईल हे नक्की !

***

**सुविचार**

तीन गोष्टी देत रहा – मान, दान आणि ज्ञान

– रवींद्रनाथ टागोर



# आठवणींच्या हिंदोळ्यावर ... !

ब्र.कु. बृजमोहनजी, शांतिवन

**२४ जून १९६५ रोजी मातेश्वरी जगदंबांनी (मम्मांनी) आपला देह ठेवला. त्यांच्याविषयीच्या आठवणी जून महिन्याच्या निमित्ताने देत आहोत.**

सर्व देव-देवतांमध्ये आदिशक्ती जगदंबेचं गायन-पूजन खूप उत्साहाने होते. कुठल्या वैशिष्ट्यांमुळे तिचं नाव जगदंबा ठेवलं गेलं असावं? शिव परमात्म्याने ब्रह्माबाबांच्या द्वारे दिलेलं ज्ञान हे मम्मांनी खूप कमी कालावधीत धारण केलं. बाबांनी जे सांगितलं व जसं सांगितलं ते त्वरित अंगीकारले. बाबांच्या प्रत्येक इशाऱ्याला शिरसावंद्य समजून स्वीकारलं म्हणून ब्रह्माबाबा म्हणत, मम्मा माझ्याहून सरस आहे.

**तपस्वी जीवन :** बाबा म्हणत, आपलं ज्ञान हे १-२ तासांचं नसून संपूर्ण जीवनच एक तपश्चर्या आहे. तपस्वी जीवन म्हणजे तुमच्या आयुष्यात येणाऱ्या समस्या या तुमच्या वागण्या-बोलण्यातून समोरच्याला जाणवू न देता त्या समस्यांवर विजय मिळवणे. मम्मांच्या चेहऱ्यावर तपस्येचं तेज झळकत असे. अगदी देहत्यागाच्या आधीच्या काही दिवसांपूर्वीही कर्करोगासारख्या दुर्धर व्याधींमध्येदेखील मम्मांच्या चेहऱ्यावर आजारपणाची कुठलीही लक्षणं दिसली नाहीत.

**वाणीमध्ये माधुर्य :** मम्मा सर्वांना सन्मानाने वागवत. लहान असो वा मोठा सर्वांच्या नावापुढे 'जी' असं संबोधन लावून मगच त्या संवाद साधत. मी त्यांच्यापेक्षा वयाने खूपच लहान असूनही पत्रांमध्ये मला लाडले बृजमोहन 'जी' असं लिहीत. त्यातही 'लाडले' शब्दामध्ये प्रेम जाणवायचे. (त्या गुरुमुखी भाषेत पत्र लिहीत असत) पत्रामध्ये शब्दसंख्या थोडी असली तरी ते सारयुक्त असे. त्यांच्या वाणीमधे आवेश, क्रोध कधीही नसे कायम प्रेम, मिठ्ठास असे.

**छोट्या-छोट्या गोष्टीतून शिकवण :** १९३८ पासून यज्ञमाता बनून मम्मांनी संस्थेची जबाबदारी सांभाळली. त्या काळी रोज रात्री कचहरी/कचेरी चालत असे. कचेरी म्हणजे दिवसभरात घडलेल्या सर्व कर्मांचा लेखा-जोखा सर्वांसमोर सांगणे व झालेली चूक कबूल करून ती चूक पुन्हा न करण्याची प्रतिज्ञा करणे.एकेक व्यक्ती येऊन ज्ञान-योगाबाबत काही प्रश्न विचारत किंवा एखादी नियमबाह्य घटना घडली असल्यास सर्वांसमोर सांगत असे.

एकदा एका बहिणीने सांगितले, आज ब्रह्माभोजनात खीर व पापड सुद्धा होता. मी माझ्या वाटणीची खीर न घेता एक पापड जास्त घेतला म्हणजे दोन पापड घेतले याचा अर्थ माझी पापडामधे आसक्ती आहे असं तर नाही? मम्मांनी सांगितलं, हो! नक्कीच ही आसक्ती आहे. पानांत जेवढं वाढलं आहे ते प्रभूप्रसाद समजून जसं आहे तसं स्वीकारलं पाहिजे असं मम्मांनी छोट्या छोट्या गोष्टीतून शिकवलं.

**तर्कशुद्ध वाणी :** मम्माच्या योगयुक्त स्थितीचा प्रभाव काय होता यासाठी कानपुरची घटना समजून घेतली पाहिजे. कानपुरच्या एका धनाढ्य व्यक्तीने (शेठ लाला हरविलास राय यांनी) कानपुर मधे आपल्या संस्थेची एक शाखा उघडली होती. ईश्वरी सेवेच्या वृद्धीकरता तेथील एका सभागृहामधे त्यांनी एक कार्यक्रम आयोजित केला व त्यासाठी प्रमुख वक्ता म्हणून मम्मांना बोलावलं मम्मांच्या येण्याची खबर शहरात पसरली होती.. ब्रह्माकुमारी संस्थेच्या विरोधात असलेल्या आर्य समाजी लोकांनी आधीपासूनच मोर्चा बांधणी केली होती अर्ध्याहून अधिक जागा आर्यसमाजी लोकांनी भरून टाकल्या जेणेकरून मम्मांच्या भाषणांत मधे प्रश्न विचारून त्यांना भंडावून सोडायचे. मधे-मधे बोलून व्यत्यय आणायचा, थोडक्यात सभा उधळून

(पृष्ठ क्र.२२ वर)



# कर्मगती

दिवंगत ब्र.कु. रमेशजी, गावदेवी, मुंबई

मुंबईचे एक फार जुने भाऊ होते, त्यांचे नाव गिरीधारीलाल होते. मी सांगितलेला त्यांचा हा अनुभव ज्ञानमृतमध्ये फार पूर्वीच छापून आलेला आहे.

गिरीधारीलाल भाई, त्यांची पत्नी सीता माता आणि त्यांची मुले हे सर्वजण यज्ञात समर्पित होते, सिंध हैदराबादेत. काही वर्षांनी त्यांची मुलं मोठी झाली आणि म्हणू लागली की आम्हाला हे ब्र.कु.बनून राहणे पसंत नाही. आम्ही लौकिक दुनियेत जाऊन तसं जीवन जगू इच्छितो. मुलांच्या ह्या हट्टापुढे आई-वडिलांनीही हात टेकले, गिरीधारीलाल आणि सीतामातांनीही यज्ञाचा त्याग केला. यज्ञ सोडून हैदराबादमधून ते मुंबईत आले. त्यांनी मुंबईत कुठलासा धंदा सुरु केला, धंद्यात त्यांना छान नफा झाला.

पण आपण सर्वजण जाणतोच, की जास्तीचा पैसा येतो तेव्हा काय होते ते ! ह्या मोहमायाजाळात आपण गुरफटून जातो. तर गिरीधारलाल भाईंचे जीवन फारच व्यग्र झाले, ह्या धंद्यामुळे. माझ्या ओळखीचे त्यांचे दूसरे मित्र होते. मी २-३ वेळा म्हटले 'गिरीधारीलाल भाई आता तर तुम्ही करोडपती झालात. आता थोडं तरी हे सर्व मुलांवर सोडून बाबांच्या सेवेत या. रोज मुरली ऐका पुरुषार्थ करा - बाबांचे मूल (बच्चा) पुन्हा एकदा व्हा. पण ते तसे करू शकले नाहीत. त्यानंतर काही दिवसांनी त्यांना ह्रदय विकाराचा झटकाही आला. पहिल्यांदा जेव्हा झटका आला तेव्हा त्यांनी त्याकडे एकदम दुर्लक्ष केलं. नंतर त्यांना दुसरा झटका आला. मी त्यांच्या घरी दोनदा गेलो. मी परत म्हणालो, 'गिरीधारीलाल तुम्ही ह्या व्यग्र जीवनातून, धंद्यातून जरा निवृत्ती घ्या. हे सर्व मुलांवर सोपवून तुम्ही आपल्या भविष्य कमाईसाठी जरा मेहनत (पुरुषार्थ) करा. पण त्यांना ते ह्याही वेळी पटले नाही.

आणि मग थोड्याच काळात त्यांना मरणाला सामोरे जावे लागले. (त्या काळात बाबा संदेशीच्याद्वारे गत व्यक्तींचा अनुभव करवत असत.) गिरीधारीलालची पत्नी सीतामाता आणि त्यांच्या मुलांनी त्यांचा मरणोत्तर नैवद्य दाखवला होता आणि मग संदेशीच्याद्वारे गिरीधारीलालचा अनुभव झाला. समोरच त्यांचे सगळे नातेवाईक बसले होते. त्यात त्यांची पत्नी, मुलं, सुना सर्वजण होते. मी त्या रूमच्या एका कोपऱ्यात बसलो होतो. गिरीधारीलालने संदेशीच्या द्वारे मला तिथून उठून स्वत:च्या समोर बसायला सांगितले. आणि मी बसताच त्यांनी गीत लावण्यास सांगितले. रेकॉर्ड वाजवणाऱ्याला सांगितले की दोनदा पाठोपाठ हेच गीत लावा. ते गीत होते - क्षमा करो नाथ मेरे, मैं चरणो की दासी हूँ । अशाप्रकारे गिरीधारीलालच्या आग्रहास्तव हे गीत दोनदा वाजवले गेले. त्यावेळी तो खूपच रडत होता. मी त्यांचे अश्रू पुसत म्हणालो, 'गिरीधारीलाल भाई तुम्ही का बरं रडता?' त्यावर ते म्हणाले, ''मी रडू नको, तर काय करू?'' म्हटलं, ''काय झालं?''

ते म्हणाले, 'जेव्हा मी शरीर सोडले, तेव्हा मी बाबांकडे गेलो, तेव्हा बाबांना म्हटलं, 'बाबा मी तर करोडपती आहे, तर यामुळे माझा पुढला ही जन्म नक्कीच चांगल्या घरात होईल.'

त्यावर बाबा उत्तरले, 'मुला, तू करोडपती (आत्ता ह्याक्षणी) नाहीस, तर होतास, (भूतकाळात) आता तुझ्या त्या धनसंपदेचे मालक तुझी मुलं झालेली आहेत. तुझं भविष्य म्हणशील, तर जिवंतपणी तू जेवढा काही पुरुषार्थ केलेला असशील, आपले तन-मन-धन जेवढे सफल केले असशील त्याच आधारावर ठरेल आणि तू ते अगदीच अत्यल्प सफल केलेस. पण तुझ्या पत्नीने सीता मातेने तुझेच धन जमेल तसे थोडे बाबांच्या यज्ञात सफल केले आहे. त्यामुळे तेवढेच काय ते तुझे भाग्य बनलेले आहे, ह्या पेक्षा जास्त निश्चितच नाही. तसेच तू हेही लक्षात घे, की तुला मी

(पृष्ठ क्र.८ वर)



# प्रकाशवाटा

## (भाग – ४)

# मुरलीधराची मुरलीवाली

दिवंगत ब्र.कु. सुभाष, ज्ञान सरोवर, आबू पर्वत
यांच्या डायरीतून

१९८३ साली ओम् शांती भवन बांधून तयार झाले. त्यात पहिल्यांदाच दादींच्या श्रीमुखातून प्रेमाने ओथंबलेली ज्ञान मुरली ऐकण्याचे सौभाग्य मला लाभले. सकाळच्या क्लास नंतर दादींनी विचारले, ''आज सायंकाळी कोण येणार आहे बरं! माझे बाबा, माझे बाबा ... आणि सर्वांनी टाळ्या वाजवल्या. मी त्या दिवसभर झोपू शकलो नाही. मनात उत्सुकता होती. बाबा कसे बरं अवतरित होत असतील? सर्वांना कसे भेटतात? ह्याच गोष्टी मनात राहून राहून येत होत्या.

मी ओम् शांती भवनात सायंकाळी पाच वाजताच व्यासपीठाजवळच खाली बसलो. सायंकाळी ६.३० वाजता प्रकाशमणी दादीजी, गुलजार दादीजींना घेऊन आल्या आणि जमलेल्या २५०० भावा–बहिणींनी टाळ्या वाजवून त्यांचे स्वागत केले. गुलजार दादीजींना आसनावर बसवून दादीजी आपल्या जागेवर येऊन बसल्या. गीत सुरू झाले. काही वेळातच गुलजार दादीजींच्या शरीराला एक छोटासा झटका लागल्यासारखे झाले आणि सर्वांनाच प्रसन्न वाटायला लागले. सर्वांच्याच मनात आनंदाच्या लाटा उसळू लागल्या. थोड्याच वेळात बापदादा सर्वांनाच शक्तीशाली, वरदानी दृष्टी देऊ लागले. माझ्या मनांत विचार आला अजून बाबांना माईक का बरं देत नाहीत? दादीजी माझ्याजवळच एक उशी घेऊन खाली सतरंजीवरच बसल्या होत्या. तेवढ्यात माईकवाला भाऊ बापदादांसमोर माईक ठेवून गेला आणि बापदादांचे पहिले शब्द कानावर पडले, ''आज... बापदादा...'' हे शब्द जणू काही हृदयात आणि बुद्धीमध्ये विजेच्या वेगाने पोहोचले एक एक कल्याणकारी महावाक्य हृदयाला शांत करत होते. अव्यक्त वाणी पूर्ण झाली आणि ग्रुप्सना भेटायला सुरुवात झाली. सातारा सेवाकेंद्राचे नाव जवळ जवळ १२.३० वाजता घेतले गेले. मी लहान असूनही सर्वात मागे बसलो होतो. बाबांनी इशारा करून मला पुढे बोलवले. माझे पाय तर जमिनीवर नव्हतेच जणू वेगळाच अनुभव होत होता. आमच्या ग्रुपला वरदान दिल्यानंतर आता वैयक्तिक भेट आणि टोली (प्रसाद) ची वेळ झाली. जेव्हा माझा क्रमांक आला, तेव्हा बाबांनी पहिलाच प्रश्न विचारला, ''कोणता तारा आहेस? मी तर शांतच झालो... मग बाबांनी परत विचारले, ''आनंदाचा तारा आहेस की यशाचा तारा आहेस?'' मी म्हटले, 'दोन्हीही'.

बाबांनी म्हटले, ''आनंदाला खऱ्या जीवनात उतरवणे म्हणजेच यशाचा तारा होणे होय. यश तुमचा जन्मसिद्ध अधिकार आहे.'' वरदान आणि टोली (खाऊ) मिळाल्याने मला अगदी भरून येत होते.

निरोप घेते वेळी प्रिय दादीजींचे अव्यक्त बापदादांना नैवेद्य खाऊ घालण्याची पद्धत खूपच आकर्षक असायची. त्या दिवसापासून बापदादा ओम शांती भवनात जोपर्यंत येत होते, पूर्ण रात्र मी जागायचो. त्यावेळी मनात यायचे बाबा येतात आणि आपण झोपायचे? छे छे, हे शक्य नाही. खूप वेळा बाबा दादींना विचारायचे, रात्रभर जागरण कुणी कुणी केले? त्यांना बोलवा आणि मला बाबांकडून प्रत्येक वेळी प्रसाद आणि दृष्टी मिळायची.

बापदादांना नैवेद्य भरवताना प्रेमळ आईच्या रूपात मला दादीजींचे दर्शन घडले.

***

### आरोग्याकरिता एक टीप

डोळ्यांची आग होत असेल तर एरंडेल तेल किंवा गाईचे तूप डोळ्यात काजळाप्रमाणे लावावे.

– संदर्भ – वैद्य सुविनय दामले लिखित – आरोग्य रहस्य



# मन नेहमी प्रसन्न असे ठेवाल

ब्र.कु. दिलीप (ओम शांती मिडिया शांतीवन)

आजच्या काळात कोणाची थोडी प्रशंसा केली तर ते लगेच आनंदित होतात आणि थोडे मनाविरुद्ध काही बोलले की नाराज होतात. अशावेळी आपल्या मनाची प्रसन्नता कशी टिकवता येईल. याकरिता अनेक लोक प्रयत्न करत असतात; परंतु काही लोक या प्रयत्नात यशस्वी होतात, तर काही अयशस्वी होतात. थोडा विचार करून बघा, खरंच तुम्ही नेहमी प्रसन्न राहू इच्छिता? मग त्यासाठी काही विशेष प्रयत्न करत आहात? नाही ना ! मनाच्या प्रसन्नतेकरिता नवनवीन मार्ग म्हणा किंवा शॉर्टकटचा वापर अनेकजण करतात. परंतु शॉर्टकटमुळेच मनाची प्रसन्नता पण कट होते, म्हणजेच शॉर्ट होते. मनाची प्रसन्नता कायम टिकवण्याकरता कोणी मोठे ज्ञानी असण्याची आवश्यकता नाही. परंतु एक छोटीशी गोष्ट लोकांच्या लक्षात येत नाही ती म्हणजे संतुष्टता. आपल्या प्रसन्नतेला कायम टिकवून ठेऊ शकते ती म्हणजे संतुष्ट वृत्ती.

ज्यांच्याकडे गरजेपुरते पैसे, कपडे, घर सुद्धा नाहीत असे अनेक लोक जगात आहेत. एखाद्या छोट्याश्या झोपडीत राहतात. दोन-चार भांडी, दोन-चार कपडे, झोपायला एखादी चटई एवढेच असते. तरीही आहे त्यातच जीवनाचा आनंद घेतात. महाराष्ट्रात संत गाडगेबाबा, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर यांसारखे अनेक संत होऊन गेले. त्यांच्याकडे जगण्याकरता आवश्यक तेवढ्याच गोष्टी होत्या किंवा तेवढ्यासुद्धा नव्हत्या. तरीही ते समाजासाठी एक प्रेरणास्रोत बनले. आज सुद्धा काही महान पुरुष आढळतात. ते समाजसेवेतच आपले सुख मानतात. सतत कुठे न कुठे समाजसेवा अविरत चालूच असते. पंजाबमध्ये गुरुद्वारामध्ये (लंगर) अन्नछत्र चालू असते त्याचा अनेक लोक लाभ घेतात.

हैद्राबाद सिंध मध्ये प्रजापिता ब्रह्मा नामक महान पुरुष होऊन गेले. त्यांनी राजस्थान माऊंट आबूमध्ये केवळ एका पर्णकुटीत राहून मानवसेवा केली आणि आज त्या संस्थेचा १४० देशांमध्ये वटवृक्षाप्रमाणे विस्तार झाला आहे. त्यांच्यावर लिखित 'जीवन पालटून टाकणारे एक अद्भुत चरित्र' या पुस्तकाचे वाचन जो करेल त्यांचे ही जीवन निश्चितच महान बनेल. महाराष्ट्रामध्ये अण्णा हजारे नावाचे समाजसुधारक आहेत. ते मंदिराच्या एका खोलीमध्ये झोपतात लहानशी खाट, जेवणाची एकच ताटली, वाटी, भांडे एवढाच त्यांचा संसार. तरी समाजसेवा हेच त्यांच्या आनंदाचे मुख्य कारण आहे. असे अनेक लोक आहेत. त्यांच्याकडे भौतिक वस्तू नसूनही मनाची प्रसन्नता कायम आहे.

जीवन एक तप आहे. ह्या जीवनरूपी तपश्चर्येतून संतुष्टतारूपी फळ प्राप्त होणे हीच जीवनाची सार्थकता आहे. जो सदैव प्रसन्न असतो, त्यालाच खरा संतुष्ट आत्मा म्हणू शकतो. प्रसन्न म्हणजे ज्याच्या मन-बुद्धीमध्ये कोणत्याही प्रकारची द्विधा नसते, मन-बुद्धी, नेहमी स्थिर असते. मन-बुद्धी नेहमी स्थिर आणि सुखमय स्थितीचा अनुभव करते, अशा संतुष्ट व्यक्तीस सर्वांच्या शुभ भावनांच्या, आशीर्वादाच्या विमानातून आपण उडत आहोत असे अनुभवास येते. म्हणजेच तो अगदी सहजपणे हलकेपणा आणि प्रसन्नतेचा अनुभव करतो.

प्रसन्न राहण्याकरता नेहमी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे, आपल्याला कोणी काही देवो, पण मी ते कोणत्या भावनेने स्वीकार करतो, त्याचा प्रभाव आपल्या मानसपटलावर पडतो. लोक तर दहा वर्ष जुन्या गोष्टी आठवून आजही दुःखी किंवा आनंदित होतात. आपल्या मनात आपण जो काही विचार करतो, बोलतो त्याची चिरस्थायी नोंद (रेकॉर्ड) होत असते. परिस्थितीनुसार ती नोंद (रेकॉर्ड) उघडते तेव्हा आपण दुःखाचा किंवा आनंदाचा अनुभव करतो; म्हणूनच आपल्या मानसपटलावर अशाच

गोष्टींना सामावून घेतले पाहिजे की कधीही ती चिरस्थायी नोंद (रेकॉर्ड) उघडली गेली, तरी आपण प्रसन्नतेचा आनंदाचाच अनुभव करू. नक्कीच आत्ता कलियुग आहे. यात प्रत्येकाचा आपला स्वभाव आहे, त्यानुसार वेगवेगळ्या प्रतिक्रिया पण आहेत. तशाच परिस्थिती पण आहेत त्यामुळे कोणतीही उदास करणारी एखादी गोष्ट, परिस्थिती तुमच्या पुढे आली, तरी मनात नेहमी प्रसन्नता असली पाहिजे. हे करणे तितके सोपे नाही, परंतु अधीर न होता धैर्याने काम केले, तर निश्चितच प्रसन्नतेचीच मनात चिरस्थायी नोंद होईल. आता हे असं का? कारण प्रसन्न राहणे हा मनुष्याच्या नैसर्गिक स्वभाव आहे. कोणती उदास करणारी किंवा नकारात्मक गोष्ट आहे ती दुसऱ्याच्या स्वभावानुसार येते आणि जाते. संयमपूर्वक मनुष्याने स्वत:ला अनुभवी बनवून नेहमी प्रसन्न राहिले पाहिजे.

एखाद्या स्वच्छ आणि विशाल हृदयाच्या व्यक्तीचे मनपण शुद्ध असते. त्यांच्यासाठी परिस्थिती, गोष्टी मोठ्या नाही, तर छोट्या भासतात. त्यामुळे ते नेहमी प्रसन्न राहतात. मनाची प्रसन्नता चिंतापासून मुक्त करते. जे नेहमी प्रसन्न राहतात. त्यांच्या जवळ कोणत्याही गोष्टीचा ना अभाव, ना प्रभाव, ना कोणाचा दबाव असतो. असे लोक एका परमेश्वराच्या कृपाछत्राखाली विसावतात आणि खऱ्या अर्थाने परमेश्वर दाता, विधाता आणि वरदात्याला आपले बनवतात. तसेच आत्मिक अनुभूती मध्ये म्हणजेच नेहमी प्रसन्न राहतात.

अध्यात्मात प्रसन्नतेचे सूत्र मनाच्या पावित्र्यात गुंफले आहे. मनाचे पावित्र्य जितके अधिक तितके स्वाभाविकपणे प्रसन्नचित्त राहणे सहजसाध्य. मनाच्या पावित्र्याची पातळी वाढविण्याचा मार्ग म्हणजे राजयोग. देहभानापासून दूर जाऊन निराकार शिवाची आठवण करणे म्हणजेच राजयोग. ही नित्यसाधना प्रसन्नतेची द्वारे उघडी करते. प्रश्न आहे अनुभव घेण्याचा ! म्हणूनच संतांनी सांगून ठेवले आहे – मन करा रे प्रसन्न, सर्व सिद्धीचे कारण!

***

---

(पृष्ठ क्र.५ वरुन)
रमेशद्वारे खूप वेळा हा संदेश दिला, सावध केलं; पण तू मात्र पैशाच्या गुर्मीत होतास, (तुम्ही समजू शकाल, पैशाची मस्ती, रग कशी असते ते आणि हे एखाद्याने दारूच्या नशेत असावे तसे माणसाचे होते.) धंद्याच्या नशेत व्यग्र राहिलास. तुला एकदा हृदय विकाराच्याद्वारेही मी सावध केले, तरीही तुला ते सर्व जाणवले नाही.

आता तुझा पुढला जन्म करोडपती नाही, तर रोडपतीच्या रूपात (गरीब) होईल.

गिरीधारीलाल पुढे सांगू लागला, ''मी म्हटले बाबा मला रमेशकडे पाठवा, जेणेकरून मी रमेशभाईंची क्षमा मागू शकेन. त्यानंतर मला बाबांनी खाली पाठवले. रमेशभाई मी काय करू सांगा आता? करोडपतीचे आयुष्य जगलेला मी – आता पुढला जन्म माझा रोडपती म्हणून होणार आहे.''

त्यानंतर त्यांनी आपल्या मुलांनाही म्हटले, 'तुमच्याजवळ जे काही धन, पैसे आहेत, ते माझ्यासाठी बाबांच्या सेवेत लावा. रमेशभाई म्हणाले की, आता तुमचा जन्म तर नक्की झालेला आहेच. पण आता जे धन तुमची मुले तुमच्या नावाने बाबांना अर्पण करतील, ते तुम्हाला परत कधी मिळेल. गिरीधारीलाल म्हणाले, 'ही शंका मी बाबांना विचारली. बाबा म्हणाले, ''तू मोठा झालास, की हे आत्ता सफल केलेले धन तुला एखाद्या लॉटरी (सोडत) च्या स्वरूपात मिळेल. पण जन्मापासून मात्र मिळणार नाही. जिवंत असताना बाबांच्या यज्ञात सफल (अर्पण) कराल, तेच जन्मापासून मिळेल.

तात्पर्य – म्हणूनच आपण जिवंतपणीच जर आपले तन–मन–धन शिवबाबांच्या नावाने अर्पण करून तसा पुरुषार्थ केला, तर नक्कीच आपले भाग्य बनेल – ह्यात शंकाच नाही.

(आधार : यु–ट्युब वरील क्लास व पुरुषोत्तम संगमयुग पुस्तकाच्या आधारे)

***

**सुविचार**

विचार करून वाचावे, अन् वाचून विचार करावा.



# यज्ञाच्या प्रथम पूजनीय आधारशीला : जशोदा मैय्या !

ब्र.कु. हेमंत, शांतिवन

असं म्हटलं जातं की प्रत्येक सफल पुरुषाच्या पाठीमागे एक स्त्री असते! खरंच नारीच नारायणाला जन्म देते व नराला नारायण बनवते. छत्रपती शिवाजी महाराजांना घडविणाऱ्या जिजाऊ, स्वामी रामकृष्णांना परमहंस बनविणाऱ्या माँ शारदा व सत्याग्रहात बापू गांधीच्या सहयोगी कस्तुरबा अशी किती नावं आहेत! मातृशक्तीच्या ह्या दीर्घ मालिकेत एक अग्रणी पण अती गुप्त नाव आहे 'राजयोगिनी जशोदा मैया' लौकिक जीवनात आदर्श धर्मपत्नी बनून पतीस धर्मकार्यात साथ देणाऱ्या जशोदा मातांनी, दादा लेखराजांच्या देहात परमात्म्याने परकाया प्रवेश केल्यानंतर पतीबरोबर शिवपित्यावर सर्वस्व समर्पण केलं. हिऱ्यांचे प्रसिद्ध व्यापारी दादा लेखराज ते प्रजापिता ब्रह्माबाबा या अलौकिक परिवर्तनाच्या प्रवासात, रुद्रयज्ञात तन–मन–धन स्वाहा करून पतीच्या पावलावर पाऊल ठेवून, समर्पित होणाऱ्या माता जशोदा खरोखर विशेष होत्या.

सिंध हैद्राबाद मधे १५ डिसेंबर सन १८७६ रोजी दिव्य पुरुषाचा जन्म झाला. पिता खूबचंद कृपलानी यांनी नाव ठेवलं लेखराज! प्रेमाने सर्व दादा लेखराज वा लखीबाबू म्हणत. बालपणीच मातेच्या ममतेला पारखे झालेल्या लखीचं संगोपन व शिक्षण हेडमास्तर पित्यानं केलं. पित्याचेही छत्र हरपले अन् लखीबाबू ज्येष्ठ बंधूच्या धान्याच्या दुकानात मदत करू लागले. दयाळू लखी धान्य विकताना गरीबांना जास्त, तर कधी उधार देई. हे पाहून मोठ्या भावास वाटलं की लखी दिवाळं काढेल म्हणून त्यांनी लेखराजांचा विवाह सुलक्षणी जशोदांशी केला. लग्नानंतर मुंबईस जाऊन दादा लेखराजांनी गव्हाचा धंदा केला. तदनंतर त्यांनी हिऱ्यांचा व्यवसाय आरंभिला आणि काय आश्चर्य! जशोदाजी भाग्यलक्ष्मी सिद्ध झाल्या. त्यांच्या पायगुणाने अल्पावधीतच दादा गर्भश्रीमंत व्यापारी बनले. त्यांनी मुंबई, दिल्ली, कोलकाता व चेन्नईत हीरे सोन्या–चांदीची दुकानं थाटली, व्यापार चांगलाच वाढत गेला.

दादा लेखराज व अर्धांगिनी जशोदाजींना जेष्ठ पुत्र किशन, कलावती, पार्वती (दादी निर्मलशांता), पुट्टू (नवनिधी), सूर्या ह्या चार पुत्री व कनिष्ठ पुत्र नारायण ही सहा सोन्यासारखी संतान रत्ने लाभली. दादा व जशोदा माता सुख–समृद्धी–संपत्ती संपन्न स्वर्गासम कुटुंबात सुखमय जीवनाचा स्वाद घेऊ लागले. दादा लेखराज पार्वतीस पालू म्हणत, म्हणून जशोदाजींना सर्व 'पालामाँ' म्हणत. 'एकनिष्ठ पूर्ण पतिव्रता नारी' हाच जशोदाजींचा खरा अलंकार व ओळख होती. दादा स्नानगृहातून अंघोळ करून आल्यावर त्या पतीचे चरण धुवून ते जल चरणामृत मानून पीत, पतीच्या मस्तकी चंदनाचा तिलक देत. त्या पतीच्या भोजनानंतरच अन्न ग्रहण करत, पतीची प्रत्येक आज्ञा पाळत. पति–पत्नी दोन्ही एकमत–एकरस होऊन राहत. मुलांना आवेशाने बोलणं, रागावणं वा क्रोध करणं तर दोघांना ठाऊकच नव्हतं. मुलांनी चूक केलीच तर मिठाई देऊन खूश करत व नंतर प्रेमाने म्हणत, 'पुन्हा अशी चूक करू नका' आधी प्रेम मग शिकवण! सकाळी पूजा अर्चना केल्याशिवाय मोठे असो वा छोटे कुणासही जशोदाजी अन्न ग्रहण करू देत नसत. मुलांकडून नियमांचे शिस्तीत पालन करवून जशोदाजींनी मुलांना दैवी संस्कार दिले. भक्ति, पूजा–पाठ, दान–पुण्य, तीर्थयात्रा, सत्संग, गुरुंचं आदरातिथ्य इत्यादी सर्व जशोदाजी मोठ्या कुशलतेनं करत. दादांसोबत राजपरिवारात जातेवेळी मुलांना रुबाबदार राजेशाही पोषाखात नटून–थटून सज्ज करणं, कुणाला कोणती भेटवस्तू द्यावी हेही त्याच ठरवत. व्यवसायाच्या नात्याने आलेल्या पाहुण्यांचा पाहुणचार व अन्य कौटुंबिक कार्य पतीच्या सल्ल्याने करत. खरं तर लखीबाबूंच्या सफल सुखी संसाराच्या आधारस्तंभ होत्या जशोदाजी!

राजेरजवाड्यांमधे मानसन्मान, सुप्रसिद्ध समाजसेवक

व प्रतिष्ठित दानवीर असे दादांचे बहुआयामी प्रतिभा संपन्न व्यक्तिमत्व साकार करण्यात जशोदाजींचा सिंहाचा वाटा होता. किंबहुना त्या प्रत्येक कार्यात दादांच्या पाठीमागे सावली बनून उभ्या राहत. ईश्वरभेटीसाठी आतूर दादांनी बारा गुरु केले होते. वेळोवेळी गुरुंच्या सत्संगाच्या आयोजनात जशोदाजीच पुढाकार घेत. गुरुंची कधीही अवज्ञा न करणारे दादा एकदा सभेतून उठले, तेव्हा ते का उठले? त्यांची तब्बेत ठीक आहे ना? ह्या विचाराने जशोदाजी त्यांच्या मागे गेल्या, पण सून राधिकेनं (जेष्ठ पुत्र किसनच्या पत्नी) त्यांना परत पाठवलं. दादांच्या ध्यान कक्षात जाऊन सुनेनं अद्भुत दृश्य पाहिलं. दादांचं ललाट दिव्य तेजाने चमकत होतं. लोचन लाल झाले होते, नेत्रातून प्रकाश पसरत होता. दादांच्या मुखातून शब्द पडले, 'निजानंद स्वरुपम् शिवोऽहम्...' राधिकेने काय झालं हे विचारल्यावर दादा म्हणाले, 'एक लाईट (प्रकाश) आणि एक माईट (शक्ती) होती.' दादांच्या देहात परमात्म्यानं परकाया प्रवेश केला होता. त्यांनी गुरुपांशी येऊन सर्व वृत्तांत वर्णिला. गुरु म्हणाले, 'तुमच्यावर ईश्वर कृपा झालीय.' तेव्हा दादा प्रभू प्राप्तिच्या ओढीने बनारसला गेले. तिथे मित्राच्या बंगल्याच्या बागेत तळ्याकाठी ईशचिंतनात मग्न असताना दादांना कलियुगाच्या महाविनाशाचा व स्वर्गाच्या स्थापनेचा सुंदर साक्षात्कार झाला. त्यांच्याच मुखाने शिव वदले, 'मला तुझ्याद्वारे स्वर्ग रचायचा आहे. तू समर्पित हो' महाविनाशाच्या साक्षात्काराने दादांना वैराग्य आलं व त्यांनी कोलकात्यास जाऊन हिऱ्यांचा धंदा आटोपता घेतला. सिंध हैद्राबाद येथे येऊन ते पत्नीस म्हणाले, 'मी शिवपित्यावर तन-मन-धन अर्पण करतोय, तुझा काय विचार आहे? तू काय करशील?' आज्ञाधारक पतिव्रता जशोदाजी म्हणाल्या, ''मीही समर्पण होते.' त्यावेळी त्यांच्या अंगावर लाखोंचे दागिने होते, ते एका क्षणात काढून दिले व नाकात फक्त नथ ठेवली. तेव्हा दादा म्हणाले, 'ही नथ का?' त्या म्हणाल्या, 'हे तर सौभाग्याचं लेणं आहे.' त्यावर दादा म्हणाले, 'मीच शिवावर अर्पित झालोय, तर नथ का?' तेव्हा जशोदाजींनी नथही काढली व चल-अचल संपत्ती स्वाहा करून पती, पुत्र-पुत्रवधू, पुत्री सहित स्वतःस ईश्वर अर्पण केलं, म्हणूनच शिवपित्याने रुद्रयज्ञात सर्वस्व होम करणाऱ्या त्या 'प्रथम पूजनीय शीलेस' अलौकिक नाव दिलं 'शील माता!' व दादांचं नामकरण केलं 'प्रजापिता ब्रह्मा!' यज्ञवत्स जशोदाजींना प्रेमाने 'मैय्या' म्हणत.

पाटण्यात जशोदाजीं सोबत चौदा महिने राहणाऱ्या कुंज दादी त्यांच्या वैशिष्ट्यांचं असं वर्णन करतात, 'लौकिक मधे पतीस परमेश्वर मानणाऱ्या, प्रेमाच्या मूर्त जशोदाजी श्रेष्ठ भक्त व सर्वोत्तम योगिनी होत्या. भक्तीनंतर ज्ञान मिळालं व ब्रह्माबाबांच्या त्या पूर्ण रुपाने अर्धांगिनी बनल्या. त्यांचा अमृतवेळेचा योग खूप शक्तिशाली होता. त्या रोज प्रेमाने शिवबाबांना (भोग) नैवेद्य दाखवत. मैय्या कधीच एकट्या जेवत नसत, त्या म्हणत कन्येनं खाल्लं नाही तर मी कसं खाऊ, कन्यांना जेवू घालूनच त्या जेवत. आम्हाला सेवा व कोर्स करता-करता अकरा वाजत, तेव्हा दोन ग्लासांमधे चहा थंड करुन पाजत. एका धनाढ्य व्यक्तिची पत्नी व उच्च कुळात जन्मलेल्या असूनही त्यांना तीळमात्र अहंकार नव्हता. त्या माझ्या सदैव साथी सहयोगी बनून राहिल्या. निरहंकारी होऊन, मन्सा-वाचा-कर्मणा सेवा करायची अति आवड होती. मी केर काढायला लागले, तर त्या फरशी पुसत. मी खरकटी भांडी उचलली की ती त्या घासत. त्यांनी दधिची ऋषी समान कर्मणा सेवा केली. हैद्राबाद व कराचीत सेवेची विशेष जबाबदारी मैय्यांवर नव्हती. आबूत आल्यावर त्या भाजीपाला (भाज्या धुवून, चिरुन घेणे इ.) विभाग सांभाळत. पूर्वीपासून त्यांच्यात भक्ती व पवित्रतेचे संस्कार प्रगाढ होते. दादांमधे ही भक्तिभाव-दानपुण्याचे संस्कार होते, तरीही त्यांना व्रत व नियमांचे पालन करायची मैय्याच प्रेरणा देत. सोमवारी त्या म्हणत आज शिवाचा दिवस आहे, म्हणून पवित्र राहूया, आज सद्गुरुचा सद्गुरुवार आहे म्हणून पवित्र राहूया, त्यावर दादा हसत-हसत म्हणत, 'तुझे तर वर्षाचे ३६५ दिवस सण आहेत.' दादा जशोदाजींची कोणतीही गोष्ट टाळत नसत, त्यांचा ते खूप आदर करत. भक्ती करत असताना व्रत-नियम पालन करण्यात अति निष्ठावान असल्याने ज्ञान मार्गातील नियमही तेवढेच दृढ निश्चयी होऊन त्यांनी पाळले.


शिवबाबांचे अवतरण 'जशोदा निवास' मधे झाले या गोष्टीचा मैय्याला खूप अभिमान वाटत असे. सिंध हैद्राबाद व कराचीत जेव्हा त्यांना साक्षात्कार होई, तेव्हा त्या अनुभव करत की श्रीकृष्ण माझ्या कुशीत खेळतोय. त्या म्हणत, 'कुंज कुणीही काहीही म्हणो, पण कृष्ण माझ्यापाशीच येईल,' सुरुवातीला त्यांचे देहभान घालविण्यासाठी बाबा

म्हणत, 'कुणा समोर उभी आहेस? कुणाशी बोलते आहेस?' तेव्हा मैय्या निश्चयपूर्वक म्हणत, 'शिवबाबांशी बोलतेय,' बाबा म्हणत, 'जोपर्यंत मम्माच्या कुशीमधे जाणार नाही, तो पर्यंत तुझा मरजीवा जन्म होणार नाही आणि तुझे देहभान जाणार नाही.' तेव्हा मैय्या मातेश्वरींच्या कुशीमधे गेल्या व बाबांनी त्यांना इतर कन्यांसोबत कुंजभवन मधे ठेवले. कधी कधी बाबांच्या काही गोष्टी मैय्यांना रुचत नसत, तरीही शिवबाबांची आज्ञा मानून करत. ओमराधेशी (मम्मा) जशोदाजींच माहेरचं जवळचं नातं होतं. त्याच राधेला समर्पित करण्यासाठी निमित्त बनल्या. मैय्या बाबांना म्हणाल्या, 'राधाचा साखरपुडा होणार आहे, तुम्हीच राधेबद्दल विचार करा की ती कशी मीरा बनेल?'

त्या सद्गुरूवारास अतिशय महत्व देत. त्या व मी पाटणा सिटी सेंटर मधे गुरुवारी भोग लावायला जाई. एकदा खूप पाऊस पडत होता. मी म्हणाले, 'सिटी सेंटर गल्लीत आहे, पावसामुळे रस्त्यात घाण पाणी साचलं असेल. मी नाही येत' त्या म्हणाल्या, 'आज सद्गुरुवार आहे हे विसरली का? एक-एक जोडी कपडे घेऊन जाऊ, तिथं जाऊन स्नान करुन कपडे बदलू.' मी गेले नाही, पण त्या क्लासमधे येणाऱ्यांसोबत गेल्या. इतकी त्यांची भोगाबद्दल श्रद्धा होती. त्यांचे धाकटे चिरंजीव नारायणदादा मुंबईला जाऊन व्यापार करू लागले. मैय्याही मुंबईस गेल्या. मुलाचं लग्न पक्कं झालं. पुत्राने पित्यास पत्र लिहिलं की अमुक तारखेला लग्न आहे. पत्र मिळताच बाबांनी मैय्यांना तार केली, 'लगेच निघून ये' मुलाने लग्नानंतर जाण्यासाठी मैय्यांना खूप विनवलं, पण मुलाचं न ऐकता, तार मिळताच त्या निघाल्या. बाबा जे म्हणाले, ते त्यांनी करुन दाखवलं. त्या लौकिक मधे परम पतिव्रता तर होत्याच, अलौकिक मार्गातही त्या परम पिताव्रता व संपूर्ण नष्टमोहा होत्या. लौकिक नातेसंबंधात त्यांचा काडीमात्रही मोह नव्हता. शिवबाबांवर पूर्ण निश्चयाच्या आधारेच त्या ज्ञानात चालल्या, पती ज्ञानात चालले म्हणून नव्हे! त्यांना नशा होता की त्यांच्या घरी परमेश्वर आले. जेवढे बाबा महान होते, तेवढ्याच मैय्याही खूप महान, उदार, शिवबाबांची अनन्य मुलगी अन् यज्ञाच्या ऑलराउण्डर सेवाधारी होत्या. शांत सरळ स्वभावाच्या मैय्यांना मी कधीही चढ्या आवाजात बोलताना ऐकलं नाही.

राजयोगी भ्राता रमेश शहाजी जसोदा मैय्यांची वैशिष्ट्ये व अंतिम स्थितीचं वर्णन असं करतात. 'जशोदा मातांनी अवश्य श्रेठ कर्म केली असतील, त्यामुळे अंतिम जन्मी त्यांचा संबंध दादा लेखराज म्हणजे ब्रह्माबाबांशी झाला. मैय्यांच्याविषयी ब्रह्मा बाबा डायरीत लिहीत, 'मी आत्मा, जशोदा सुद्‌धा आत्मा.' जशोदाजींना जीवनात किती जबरदस्त त्याग, कठोर परिवर्तन करावं लागलं. जोपर्यंत दादा लेखराजांच्या त्या अर्धांगिनी होत्या, तोपर्यंत दादांच्या लौकिक मुलांच्या आई होत्या. दादांमधे शिवबाबांनी प्रवेश केला, अन् कालपर्यंत ज्यांना पती समजत होत्या, त्यांना आज अलौकिक पिता समजणं-किती कठीण मानसिक महापरिवर्तन त्यांना करावं लागलं असेल! एवढा मोठा संबंधांचा त्याग करणं कुणालाही सहज शक्य नाही! अंत समयापर्यंत दुःखाच्या भानापासून मुक्त राहणं व अखेरच्या श्वासापर्यंत सेवा करणं मी जशोदा मातांकडून शिकलो. मैय्यांची अंतिम अवस्था ज्ञानमार्गाच्या पथिकांना प्रेरणा देणारी होती. मुंबईत जशोदा माता आजारी असताना, मी त्यांना भेटायला जाई. देहत्यागाच्या आधी एक दिवस भेटायला गेलो. त्या म्हणाल्या, 'रमेशजी या, कोणती टोली (मिठाई) खाणार?' मी म्हणालो, 'मैय्या तुम्हाला खूप त्रास होत असेल ना!' त्या म्हणाल्या, 'नाही, त्रास तर शरीराला होतो, मला नाही.' रुग्ण असतानां आपण आजाराचं स्वरुप बनतो, कुणीही चेहरा पाहून समजतो की आजारी आहोत, तब्येत ठीक नाही हे वेगळ सांगावं लागत नाही, परंतु मैय्यांच्या शरीराची अंतिम अवस्था होती. तरीही त्या देहाच्या भानापासून मुक्त होत्या. त्यांच्या पोटात गाठ होती. गाठीचे ऑपरेशनही झाले. डॉक्टरांनी सांगितलं होतं की शरीर कधीही सुटेल. परमत्यागी मैय्या जशोदा तर ज्ञान मुरलीच्या दिवाण्या होत्या. १६ जून १९६१ रोजी स्नानानंतर दादी निर्मलशांताजी त्यांना मुरली ऐकवत होत्या, ईश्वरी महावाक्य ऐकता-ऐकता शिवबाबांच्या आठवणीत मैय्याने देह त्यागला व पक्षी देहाच्या पिंजऱ्यांतून मुक्त झाला. परमेश्वराला स्वगृही प्राप्त करुन, सर्वांच्या आधी शिवावर बलि चढणाऱ्या, ईश्वरी सेवेत सर्वस्व पणाला लावून स्वतःस अतिगुप्त ठेवणाऱ्या रुद्र यज्ञाच्या त्या प्रथम पूजनीय शीलेस, त्यांच्या १६ जून ह्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने त्यांना अमुचे शत्-शत् नमन....!

***



# तू माझा सांगाती

**ब्र.कु. साहेबराव, तळेगाव दाभाडे**

मी त्यावेळी कजगांव येथे वास्तव्याला होतो. १९९४ साली आमच्या गावात रात्री ब्रह्माकुमारीजतर्फे प्रवचन चालत असे, आम्ही एक आठवडा ते ऐकले. त्यानंतर गावात ज्ञान-मुरली क्लास सुरू झाला. मी प्रथम मुरली क्लासला जात होतो. नंतर मध्येच साधारण दोन महिने मुरलीला जाणे बंद झाले. पण माझ्या पत्नीने कोर्स पूर्ण केला व ती नियमित मुरलीला जाऊ लागली. घरी आल्यावर ती मला मुरलीतील वरदान, स्लोगन व पुरुषार्थाविषयी सांगत असे. तिला वाटे मी धारणा करावी. तिच्या आग्रहास्तव मी पुन्हा मुरली क्लासला जाऊ लागलो. गावातील सर्वजण हळूहळू येऊ लागले. आमचे नातेवाईक पण बाबांच्या ज्ञानमार्गावर चालू लागले.

एके दिवशी माझा अमरनाथ देवस्थानातर्फे सत्कार करण्यात आला. सर्वकाही शिवबाबांच्या कृपेचे फळ होते. याची सुंदर अनुभूती मला येऊ लागली. माझ्यात सकारात्मकता वाढू लागली. लोकांपर्यंत राजयोगाचे धडे पोहोचवण्याचे आमचे कार्य चालू होते. एके दिवशी मुरली ऐकून घरी येताना साधारण रात्रीचे ८ वाजले होते. आम्ही फूटपाथवरून चालत होतो. अचानक एक गाडी आली नि आम्हाला धडक देऊन गेली. रस्त्याच्या दोन्ही बाजूला आम्ही दोघे फेकलो गेलो. दोघेही हातापायाने अधू झालो. चाळीसगांव येथील दवाखान्यात आमच्यावर उपचार करण्यात आले. पण बाबांच्या कृपेने थोडक्यात निभावले. पहाटेच मी माझ्या पायांवर उभा राहिलो. डॉक्टरांना सुद्धा या गोष्टीचे नवल वाटले. योग व मुरली ऐकणे चालूच होते. बाबा आपल्या मुलांना कसे फुलाप्रमाणे जपतात.

दुसरी घटना अशी झाली दि. १.११.२०२२ रोजी एका नवीन सेंटरच्या वाढदिवसानिमित्त ब्रह्माभोजन व उद्घाटन असा कार्यक्रम होता. मी दीदींबरोबर सेवा करत होतो. अचानक माझ्या छातीत दुखू लागले. मला घरी यावे लागले. २ कि.मी चालतच मी घरी आलो. दवाखान्यात गेल्यावर समजले हार्टअॅटक आला आहे. एंजियोग्राफी करावी लागली. डॉक्टरांच्या सल्ल्याने पुणे येथे माझ्यावर शस्त्रक्रिया व्यवस्थित पार पडली. बाबांची आठवण सतत माझ्याबरोबर होती. बाबांनी मला सुखरूप घरी आणले होते. मला जगण्याची नवी उमेद मिळाली.

माझी बाबांवरील श्रद्धा वाढतच होती. मी रोज अमृतवेळेला योग करतोच. बाबांशी राजयोगाच्या अभ्यासात मनोमन बोलत असे. मला नेहमी वाटायचे आपल्याला सर्व सुखसोयी असलेल्या ठिकाणी राहायला मिळावे. तिथे सर्व सुविधा असाव्या. त्याप्रमाणे मी बाबांसमोर खालीलप्रमाणे गोष्टी ठेवल्या.

शिवबाबा, आम्हाला, घर सेंटरच्या जवळ मिळावे. घराजवळ सर्व आवश्यक सोयी असाव्यात इ.

त्याप्रमाणे बाबांनी सर्व काही देऊ केले. प्रामाणिकपणे केलेली आठवण परमात्म्यापर्यंत नक्कीच पोहोचते. तोच आपला पिता आहे. टीचर, सद्गुरू, मित्र सर्व काही आहे.

अजून एक छोटासा अनुभव सांगावाच लागेल. माझी धाकटी मुलगी गुजरातमध्ये भिलाड गावी राहते. मी तिच्याकडे गेलो, मला वाटले माझा ज्ञानमुरली वर्ग कसा होणार? म्हणून मी सेंटरची चौकशी केली. तर समजले सेंटर लांब आहे ! आता काय करावे? माझ्याकडे गाडी नाही. कसे जायचे पण इच्छा प्रबळ असल्यामुळे मी घरातून बाहेर पडलो की मला वाहन मिळायचे. दोन्ही वेळेला माझी सोय बाबा करायचे व माझी मुरलीला जायची इच्छा पूर्ण व्हायची. बाबा आपल्यासाठी आहे, फक्त प्रेमाने साद झाला. तो आपल्यासाठी तत्पर असतो. फक्त इच्छा ठेवा मार्ग सापडतो. आणि सत्याच्या मार्गाने जा, अनुभूती आल्याशिवाय राहत नाही. बाबा मेरे साथ है ।

जेथे जातो तेथे तू माझा सांगाती ।
चालविसी हाती धरोनिया ।।
या ओळींची प्रचिती पदोपदी येते.

***



# "शिवबाबा : माझा पाठीराखा"

(भाग ३)

## बाबाने दिली पाठशाळेला जागा !

ब्र.कु. बापू , कोल्हापूर

**शेतकरी कुटुंबात जन्मलेले कोल्हापूर जिल्ह्यातील कांडगावचे रहिवासी ६५ वर्षीय बापूभाई आजन्म ब्रह्मचारी ब्रह्माकुमार आहेत. त्यांना आजवर आलेले ईश्वरी अनुभव थक्क करणारे आहेत. आपणा सर्वांसाठी क्रमश: प्रसिद्ध करत आहोत...**

नोव्हेंबर १९८७ मध्ये मी ज्ञानमार्गात आलो. गावातील माझे मित्र महादेव भाई यांच्यामुळे हे घडले. त्यांनी मला ब्रह्माकुमारीविषयी माहिती दिली. त्यांच्यामुळे मला बाबांचा परिचय झाला. त्यावेळी माझा आय. टी.आय. चा फिटरचा कोर्स चालू होता. त्याचवेळी मला हे ज्ञान मिळाले. मी सात दिवसांचा साप्ताहिक कोर्स केला. मला ज्ञानाची ओढ लागली. कांडगाव ते कोल्हापूर दररोज १४ किमी सायकलवरून जाऊन येऊन मी कोर्स पूर्ण केला. खरं तर त्यावेळी मी पहिलवानकी पण करत होतो. गावोगावी जत्रे – यात्रेच्या निमित्ताने कुस्त्यांच्या फडात कुस्त्याही करत होतो. पण मला बाबांच्या ज्ञानाचा इतका लळा लागला की मी कुस्ती विसरून गेलो आणि कधी कधी पहाटे ३ वाजता कांडगावातून सायकलवर बसून कोल्हापूरला येऊन सेंटरवर अमृतवेळेचा योग करू लागलो.

पाच – सहा महिन्याच्या आत मी संपूर्ण गावाला बाबांचा संदेश दिला. त्याचा प्रतिसादही चांगला मिळाला. सुरूवातीला १०० च्या वर लोक येत होते. नंतर ज्यांची धारणा पक्की झाली असे पंचवीस तीस भाऊ–बहिणी नियमित येऊ लागले. परंतु क्लाससाठी जागेचा प्रश्न निर्माण झाला. तात्पुरती जागा विष्णुभाईच्या घरी मिळाली. माडीवर जागा होती. पण त्याला जिना नव्हता. क्लासला येणाऱ्यांना शिडीवरून कसरत करत वर यावे लागायचे. एकदा आमच्याकडे नागपूरच्या पुष्पादीदी रात्री क्लास करण्यासाठी आल्या होत्या. त्यांनी ही शिडी बघितली आणि चकित झाल्या. त्या म्हणाल्या, बापूभाई ८४ जन्मांच्या शिडीपेक्षा तुमची ही शिडी अवघड आहे. त्यांना अगदी हाताला धरून सावकाश वर घेण्यात आले. त्या म्हणाल्या, मी दुसऱ्यावेळी येथे येईपर्यंत दुसरी जागा घेऊन क्लास तेथे सुरू करा.

त्यानंतर क्लासच्या जागेसाठी आमची शोधाशोध सुरू झाली. आम्हाला गावातील विठ्ठल मंदिरात दहा फूट बाय अडीच फूटाची एक खोली मिळाली. तिचे १५ रूपये भाडे आणि १० रूपये लाईट बिल ठरले. असे काही दिवस गेले. काही बहिणीही क्लासला येऊ लागल्या होत्या. त्या म्हणू लागल्या, किती छोटी खोली आहे ही ! जरा मोठी खोली घ्या ना ! पण गावात कुठे जागा मिळत नव्हती.

मी बाबाला दररोज म्हणत असे, या खोलीमध्ये किती दिवस काढायचे? तुम्ही तर म्हणता देश – विदेशात ब्रह्माकुमारीचा संदेश पोहोचला आहे. आपली सेंटर्स सर्वत्र आहेत. मग आम्हीच या खोलीमध्ये किती दिवस काढायचे?

असे म्हणत म्हणत चार वर्षे गेली. एकदा तर अमृतवेळेला मी बाबांवर रूसूनच बसलो आणि म्हणालो, बाबा, जोपर्यंत क्लाससाठी जागा मिळत नाही तोपर्यंत आसनावर बसणार नाही. खाली बसूनच मुरली वाचणार. असे एक वर्ष चालले. एकदा तर अमृतवेळेला मी बाबांशी गुजगोष्टी केल्या. त्यावेळी बाबांनी मला सांगितले, धीर धर बेटा. तुला लवकरच मी जागा मिळवून देणार आहे.

त्यानंतर एक महिना झाला. कसलेच काही चिन्ह दिसेना. मी परत बाबाला म्हणालो, मंत्र्याप्रमाणे आम्हाला तुमची नुसती आश्वासने नको. क्लासच्या जागेचे काय ते बघा. आणि तीन महिन्यानंतर आश्चर्य झाले. मधुबनमध्ये

(पृष्ठ क्र.२२ वर)

# मी पाहिलेली मितभाषी महान विभूती

ब्र.कु. संतोष दीदी,
महाराष्ट्र, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा झोन संचालिका



ज्या दिवशी साकार बाबा (ब्रह्मा बाबा) अव्यक्त झाले, त्या दिवशी आम्हा मुलांना खूपच मोठा धक्का बसला, कारण आम्ही सर्वजण असेच समजत असू की, सत्ययुग येईपर्यंत बाबा आमच्या बरोबर राहतील आणि विश्व-परिवर्तनही आम्ही बाबांबरोबरच बघू. जेव्हा अचानक हा निरोप मिळाला, तेव्हा डोळ्यांसमोर थोडी अंधारीच आली. परंतु त्यानंतर अव्यक्त बापदादांनी २१ जानेवारीला येऊन गुलजार दादींच्या देहाद्वारे ज्ञान मुरली सांगितली आणि प्रत्येक गोष्ट एकदम स्पष्ट केली. बाबांनी असाही अनुभव करविला, की कुणाच्या वडिलांची जर पदोन्नती झाली, तर त्यांच्या मुलांनाही खूप आनंद होतो ना! त्याचप्रमाणे बाबा साकार शरीर सोडून अव्यक्त झाले, म्हणजे त्यांची पदवी खूप मोठी झाली, तर मुलांनाही ह्या गोष्टीचा आनंदच झाला पाहिजे.

**दादी खूप कमी बोलायच्या कारण त्या विचारही खूप कमी करायच्या**

बाबांनी गुलजार दादींनाच माध्यम म्हणून का निवडले बरे? याचे कारण म्हणजे दादींची निर्संकल्प अवस्था, पवित्रता आणि शुद्ध वाणी तसेच निमित्त भाव हे होत. दादींच्या वचनात कधीही दुसऱ्याला टोचणारे शब्द नसत. बापदादांनी ज्यावेळी आपले माध्यम म्हणून दादीजींची निवड केली तेव्हापासून दादींनी अथक होऊन १२-१४ तास सातत्याने एकाच स्थितीत बसून सेवा केली. दादींचे वागणे सर्वांना भेटताना सुद्धा निर्मोही तरीही अती प्रेमळ होते.

ज्याप्रमाणे ब्रह्मा बाबांच्या डोळ्यांत आपण बापदादांना बघितले, त्यांचा अनुभव घेतला तसेच दादींच्या डोळ्यात सुद्धा आपण बापदादांना बघितले, अनुभव घेतला. दादी खूपच नम्र होत्या. त्यांना कधीच कुठल्या गोष्टीचा अहंकार नाही आला. मी दादींचा स्वर कधी वाढलेला ऐकला नाही. त्या खूपच कमी बोलायच्या, कारण त्या खूपच कमी विचार करायच्या. ज्यांचा स्वतःच्या विचारांवर ताबा असतो, त्यांचा स्वतःच्या बोलण्यावर आणि कर्मांवर पण ताबा असतोच.

सर्व ब्रह्मावत्सांची चातकासारखी इच्छा असे, की दादींच्या मुखातून काहीतरी महावाक्ये (उद्गार) निघावे व आपण ऐकावे. कारण दादींच्या मुखातून निघणारे प्रत्येक वाक्य समोरच्यासाठी जणू काही वरदानच ठरायचे.

मी तर त्यांच्यापासून खूप दूर, मुंबईत राहायचे, पण मनाची जवळीक असल्याकारणाने आणि प्रत्यक्ष बापदादाच त्यांच्या तनात येत, त्यामुळेच त्यांच्याविषयी जवळीक भासे.

**दादी सर्वांनाच समान प्रेम देत असत.**

शिवबाबा कुणात पक्षपात म्हणजेच भेदभाव करत नाही. म्हणूनच त्याला परमेश्वर म्हणतात. बाबांसोबत राहता राहता बाबांच्या सर्व गुणांच्या रंगात दादींही रंगून गेल्या होत्या, हे मला सतत जाणवायचे. दादींच्याही मनात कुणासाठी भेदभाव नव्हता. त्यांच्यासाठी सगळेच एकसमान होते. सर्वांना समान प्रेम आणि संगोपन देत असे. दादींची हीच इच्छा असे, की सर्वांना साकार बाबांचे संगोपन मिळावे, कुणालाही असे वाटू नये की, बाबा आता साकाररुपात नाहीत, ते गेले. माझ्या मनात जो विचार यायचा की साकार बाबा आता नाहीत. ती कमतरता दादींच्या संगोपनाद्वारे पूर्ण झाली.

**दादींचे हृदय खूप मोठे होते.**

दादी कधीच कुणाच्या कोणत्याही गोष्टींचं वर्णन करीत नसत. काही घडलेच, तर त्या गोष्टीला पूर्णविराम लावीत असत. याच एका कारणामुळे त्या निर्संकल्प राहत असत.

दादींचे मन फार मोठे होते. दादींना आमची हीच खरी श्रद्धांजली असेल - आपण सुद्धा दादींसारखेच, त्यांचे गुण

(पृष्ठ क्र.२३ वर)

# प्रश्नोत्तरे

(भाग २)

ब्र.कु. सूरज, आबू रोड



**प्रश्न :** भाईजी, एक प्रश्न सर्वांच्याच मनात येतो आणि तो म्हणजे दादी हृदयमोहिनीजी एवढ्या निर्मळ, सरळ (आत बाहेर स्वच्छ) स्वभावाच्या होत्या, त्यांची तपस्या तर जबरदस्तच होती तसेच त्यांच्याद्वारे परमेश्वराच्या अवतरणाचा अनुभव होत असे. तरीही त्यांच्या शरीराला अनेक प्रकारच्या आजारांनी ग्रासलं होतं, आणि त्याचा त्रासही जास्त होता. त्या कॅन्सरसारख्या दुर्धर आजारानीही ग्रासित होत्या – तर असं का झालं?

**उत्तर :** खरंच – तुमचा प्रश्न अगदी नैसर्गिक, कुणालाही पडावा असाच – त्यामुळे हुशार व्यक्तीच्या मनात हा प्रश्न नक्कीच येईल की, ज्यांच्या शरीराचा आधार प्रत्यक्ष परमात्मा घेतो, त्यांना हे सर्व रोग का? किंवा जे अति परमपवित्र असतात त्यांच्या वाट्याला हे का यावे? मला ह्या प्रश्नांची उत्तरं द्यायला नक्कीच आवडेल.

असं बघा, ह्या महान सृष्टिचक्रात, आदिपासून अंतापर्यंत अनेकांनी खूप मोठी पदं भूषविली. मोठी पदं म्हणजे मोठे सम्राट, महाराजा–महाराणी–सत्ययुगात तर विश्व महाराजन् वगैरे. तर द्वापर युगापासून आपण इतिहासात बघतो, की अनेक प्रकारची युद्ध झाली आणि एखाद्या राजाचा एखादा छोटा, चुकीचा निर्णय अनेक लोकांना कष्टाच्या किंवा दुःखाच्या खाईत लोटून गेला असेल. तर हे जे मोठे आत्मे असतात, जसे बघा आज पंतप्रधान एखादा चुकीचा निर्णय केला, तर त्याचा परिणाम मोठ्या जनमानसावर होतो आणि दीर्घकाळही राहतो. ज्येष्ठ साधकांच्या आजारी पडण्यातही अनेकांचे कल्याण वा सेवा घडणार असते. त्यांचे आजार, डॉक्टर, हॉस्पिटलचे कर्मचारी आणि अनेकांना प्रेरणा देण्याचे काम करतात. पूर्वजन्मातील काही हिशेब आजाराच्या रूपानेही पूर्ण करावे लागतात. असंच काही प्रत्येकाच्या आयुष्यात समोर येऊ शकतं.

जया अंगी मोठेपण तया यातना कठीण. आता अजून एक गुपित आहे ह्या मागचे – जे अनेकांना माहीत नसेल. दादी हजारो वेळा ध्यानात गेल्या आहेत. त्यातील १२००–१४०० वेळा, तर बाबांच्या अवतरणाच्या निमित्ताने त्या ध्यानावस्थेत गेल्या. ह्या व्यतिरिक्त अगदी सुरुवातीपासूनच ध्यानावस्थेत जाणं हे वरदान परमेश्वराकडून त्यांना प्राप्त होतंच. तर आपण म्हणूया की ५००० वेळा त्या ध्यानात गेल्या. आणि अशा अवस्थेत आत्म्याचं मेंदूतील काही केन्द्रांशी असलेलं नियंत्रण किंवा संपर्क तुटतो आणि ध्यानातून बाहेर येताच पुन्हा जोडला जातो. आता गंमत बघा हं – कोणत्या गोष्टीचा संपर्क सारखा सारखा तुटला आणि सारखा सारखा जोडला गेला तर शरीराचा तो भाग नक्कीच थकून जाणार. त्याचा आरोग्यावर अनिष्ट परिणाम झाला असेलही. त्यात कलियुगातील वातावरण – आपण बघतो की अन्नावर – धान्यावर, फळांवर, भाज्यांवर अनेक प्रकारची किटकनाशक औषधं फवारणी करत आहेत. आणि आपल्यालाही हेच अन्न खावं लागतं. तर अशा नित्कृष्ट दर्जाच्या अन्नामुळेही रोग वाढत चालले आहेत. दादींचे शरीरही वरील सर्व प्रकारांमुळे थकले असावे.

आता मी एक वस्तुनिष्ठ गोष्ट सांगतो – मी आत्ताच म्हटलं तसं शिवबाबा दादींच्या द्वारे १२००–१४०० वेळा तरी सर्वांना भेटले असतील आणि आले की बाबा मग आधी ४ तास असायचे, कधी अधिकही म्हणजे १२–१२ तास तर कितीतरी वेळा असतील. त्यावेळी दादी एकाच अवस्थेत बसत. जरी बाबांची दिव्य शक्ती कार्यरत होती तरी शरीर तर शेवटी दादींचं होतं – त्यांना त्याचे दुष्परिणाम जाणवू लागले. पाय दुखायला लागले – पायात गाठी निर्माण झाल्या, काही जागी तर blockages ही तयार झाले. आपण एक जरी एकाच स्थितीत बसलो, तरी किती त्रास होतो काय

अवस्था होते कळू शके. चेहरा मोहरा बदलून जातो. सारखे पाणी पितो, औषध घेतो. शेवटी प्रकृतीच्या मर्यादा आहेतच ना!

त्यामुळे नंतर शरीर थकल्याने त्यांना खूप आरामाची आवश्यकता असे. हीच ती सूक्ष्म कारणं. बाकी ह्या जन्मात तरी त्यांनी कधी कुणाला ना दु:ख दिलं ना वाईट बोलल्या. त्या खूपच निर्मळ स्वभावाच्या, नि:स्वार्थ विश्व सेवेत समर्पित, त्या आत्म्याला स्वत:साठी काही नको होतं – अशा त्या महान विभूती होत्या. जणू काही त्यांनी स्वत:चं अस्तित्वच नष्ट केलं होतं, परमात्म समर्पण भावाने. दादींना बघितलं काय अन् बाबांना बघितलं काय काही फरकच कळायचा नाही. ह्या विषयीचा एक अनुभव सांगतो – एकदा अजमेरला एका सोनाराच्या घरी मी गेलो असताना त्यांनी मला सांगितले – की आमच्या घरी एक खूप मोठा ज्योतिषी (नावाजलेला) काही सोन्याच्या वस्तू बनविण्यासाठी आला होता. त्यांच्या घरात गुलजार दादी म्हणजेच अव्यक्त बापदादांचा एक फोटो लावलेला होता. तर ते म्हणाले की तो ज्योतिषी तो फोटोकडे बघतच राहिला. एक एक –कितीतरी वेळ मी विचारलं, 'पंडितजी काय बघताय?' तर तो एकदम आश्चर्याने म्हणाला की, 'ह्यांच्या फोटोत मला सारखे शिवलिंग दिसतयं. तेव्हा मी त्याला (ज्योतिषाला) ह्या मागचं रहस्य सांगितलं, 'शिवबाबा ह्यांच्या शरीरात परकाया प्रवेश करत असत. हा फोटोही त्या वेळेचा आहे. त्यावेळी परमात्म अवतरण झालेले होते. म्हणून तुम्हाला त्यात शिवलिंग दिसतयं. ह्यांच्या द्वारे परमेश्वर आम्हाला भेटायचा, दृष्टि द्यायचा, बोलायचा!

**प्रश्न :** आता ह्या घडीला कोणत्या प्रकारचा पुरुषार्थ करावा,

**उत्तर :** आपण रोज परमेश्वरी महावाक्य (मुरली) ऐकतोच ते त्यांचं मार्गदर्शन आपल्याला नित्य आहे. त्याप्रमाणे आपल्याला वागायचे आहे, आणि दादींनी, बाबांचे जे आदर्श आचरणात आणले ते आपणही आपल्या जीवनांत धारण करणे हीच दादींसाठी खरीखुरी श्रद्धांजली असेल. जसे दादी निर्मळ, निच्छल, निर्विकारी बनल्या, तसे आपणही बनण्याचा प्रयत्न करूया. जसे त्यांनी परमेश्वरास सर्व समर्पण केले – मन – बुद्धी – संस्कार आणि शरीरासहित. तसे आपणही करावे. त्यांच्यासारखे महान योगी आपणही बनूया. तर हे जर आपण आचरणात आणले. असा पुरुषार्थ केला, तर आपणही त्यांच्या प्रमाणे महान बनू ह्यात शंकाच नाही.

**प्रश्न :** आता पुढचा प्रश्न जरा वेगळ्या विषयावरचा आहे. घरातील मद्यपी व्यक्तीशी कसा व्यवहार करावा हे कळत नाही. काय करायचे?

**उत्तर :** अशा व्यक्तीसाठी आपण योगाला बसल्यावर एकाग्र होऊन खालीलप्रमाणे विचार करावे –

तू खूप शक्तीशाली आहेस. दारू सोडून देण्याची शक्ती तुझ्याकडे आहे. तू दैवी पवित्र आत्मा आहेस. दारू पिणे हे तुझे संस्कार नाहीत तुझे संस्कार तर अति पवित्र आहेत तेव्हा ह्या विषाचा (दारूचा) तू आता त्याग कर.


शेवटी अती शक्तीशाली आज्ञा करा. त्या व्यक्तीला – तू दारू सोडून दे. अशा प्रकारच्या संकल्पांना २१ दिवस एकाच जागी बसून एकाच ठरवलेल्या वेळी केले तर लाभ होऊ शकतो.

कुणी व्यक्ती तुम्हाला खूप त्रास देतोय, वाईट बोलतोय, तुमचे नुकसान करण्याचा प्रयत्न करतोय – तर अशा व्यक्तीलाही आत्मा समजून सकारात्मक विचार पाठवा. विचार संक्रमित करा (मानसिक संवाद) तू खूप चांगला आत्मा आहेस. तू खूप बुद्धीवान, हुशार आहेस. तू इतरांना सुख देणारा आत्मा आहेस. तू साक्षात ईश्वराचा पुत्र/पुत्री आहेस. म्हणूनच तू सर्वांना सुखच देतोस.

शेवटी आज्ञा द्या – तू आपल्या सुंदर आणि गोड बोलण्याने सर्वांना सुख देत जा. जर तू इतरांना सुखं दिलंस, तर मग तुलाही तेच म्हणजे सुखच मिळेल. कारण आपण लोकांना जे देतो, तेच आपल्याला कितीतरी पटीने मिळत असतं. ह्या आज्ञा त्या व्यक्तीला झोपलेली असताना तिचे अंतर्मन मात्र सतर्क/जागे असते.

तर रोज सकाळी ठरवलेल्या वेळी, एका जागी बसून हे शक्तीशाली संकल्प करावे. सकाळी किंवा पहाटे ४ वाजता ५ किंवा ६ वाजेपर्यंत (जास्तीत जास्त) तुम्ही हे करू शकता. जितके मनोबल मोठे तितके साफल्य मोठे.

***



# यज्ञेतिहासाची पाने चाळताना...

**दादी जानकीजी**

भगवद्गीतेत स्थितप्रज्ञ स्थितीचे वर्णन आढळते. निंदा-स्तुती, लाभ-हानी अशा अनेक आव्हानांत ज्याची मती स्थिर राहते तो स्थितप्रज्ञ ओळखावा. काही वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. नेहमीप्रमाणे बाबा ज्ञानमुरली विशद करीत होते. उपस्थित सर्व मंडळी तन्मयतेने श्रवण करीत होती. अचानक एक माता उठून उभी राहिली. या ईश्वरी ज्ञानमार्गात तिची तितकी परिपक्व अवस्था नव्हती. तसेच तिच्यावरील परिस्थितीमुळे ती गांजलेली होती. सतत येणाऱ्या आव्हानांना तोंड देता-देता थकून गेली होती. साकार बाबांच्याद्वारे हे ज्ञान ऐकवणारे साक्षात् शिवबाबाच आहेत यावरही तिचा तितकासा विश्वास नसावा. ती उठून उभी राहून अचानक बाबांना सुनावू लागली. 'ईश्वराने माझे काय भले केले'... इत्यादी. समोर बसलेले सर्व ब्रह्मावत्स अवाक् झाले. मात्र बाबांची चर्या अत्यंत स्थिर होती.

बाबा फक्त तिच्याकडे प्रेमळ दृष्टी देत मौन धारण करून बसले. काही क्षणांत नीरव शांतता आमच्या त्या वर्गात पसरू लागली. मात्र त्या मातेवर याचा परिणाम होत नव्हता. तिचा आवेश शांत होईपर्यंत पंधरा मिनीटे सहज गेली असावीत. एवढ्या वेळात आम्ही सर्वजण बाबांकडून शक्तिशाली दृष्टी घेण्यात मग्न झालो. ती बिचारी आवेग ओसरल्यावर वर्गातून निघून गेली. त्यानंतर बाबांनी पुन्हा ज्ञान मुरली उच्चारायला सुरुवात केली. बाबांच्या चेहऱ्यावर घडल्या घटनेचा पुसटसाही पडसाद नव्हता. जणू काहीच घडलं नव्हतं. झाल्या प्रकाराबद्दल नंतर कधीही बाबांनी अवाक्षर काढल्याचे कुणी ऐकले नाही.


मी या सगळ्यातून खूप काही शिकले. बाबा आपल्याला नेहमी सांगतात, तुमच्यावर परिस्थिती कुठल्याही प्रकारची येवो, तुमचा चेहरा हर्षित रहायला हवा आणि बुद्धी स्थिर पाहिजे. मायेचा वार कधीही कुठेही होऊ शकतो, याकरिता अलंकारी विष्णूसमान स्थिती असेल, तर मायेसमोर पराभव होणार नाही. दुसरी गोष्ट, जर बाबांनी तिला काही समजावण्याचा प्रयत्न केला असता, तर स्वतःच्या स्वभाववश आवेगात तिच्याकडून मर्यादांचे अधिक उल्लंघन झाले असते. त्या उल्लंघनाचे ओझे तिच्या डोक्यावर चढले असते ते अजून वेगळे. अपार करुणेचे सागर बाबा, किती कल्याणकारी भाव हृदयात बाळगून असत त्याचे ते दर्शन होते.

तिसरी गोष्ट, बाबांनी आम्हाला सहनशीलतेसोबत सामावण्याची शक्ती काय असते ते दाखवून दिले. एखादा प्रसंग मी सहन केला; पण नंतर त्याचे कुठेही वर्णन केले किंवा चिंतन केले याचा अर्थच मी ते सहन केलेच नाही. सहनशक्ती, सामावण्याच्या शक्तीसोबतच सदैव असते. एक शक्ती आली की दुसरी आलीच पाहिजे. त्या आपसांत एकमेकींच्या जिवलग सखी आहेत. एकमेकांविना राहूच शकत नाहीत.

चौथी गोष्ट म्हणजे बाबा परमशिक्षक आहेत. प्रत्यक्ष कर्म करून दाखवतात आणि शिकवतात. जेणेकरून विद्यार्थ्याला अनुकरण करायला सोपे जावे. या शाळेत शिक्षकाच्या पावलावर पाऊल ठेऊन पुढे जायचे आहे. येथे कॉपी करणे हाच पुढे जाण्याचा मार्ग आहे. बाबा जसे परमशिक्षक आहेत तसेच सद्गुरुही आहेत. सद्गुरुशी तादात्म्य पावणे हीच जीवनातील मोठी कला आहे. त्याच्याशी आपल्या विचारांच्या तारेचा तानपुरा लावणे म्हणजेच सगळं काही प्राप्त करण्याकडे वाटचाल करणं आहे.

मला आठवतंय एकदा मी बाबांना काही प्रश्न विचारू लागले तेव्हा बाबा म्हणाले, "बेटी प्रत्येक गोष्ट विचारतेस कशाला? नीट बघ तुझ्यासमोर मी कशी कर्म करतो ते."

(पृष्ठ क्र.२६ वर)



# निर्विघ्न बनण्यासाठी लवलीन अवस्थेमध्ये रहा

ब्र.कु. भगवान, शांतिवन, आबू रोड

वर्तमानवेळी या बाह्यजगापासून जर स्वतःला सुरक्षित ठेवायचे असेल तर मग प्रभू मिलनामध्ये, प्रभू प्राप्तिमध्ये स्वतःला लवलीन ठेवणे गरजेचे आहे. लवलीन अवस्थेमध्ये ज्यावेळी आपण राहतो तीच आपली कर्मयोगाची अवस्था किंवा अंर्तमुखतेची अवस्था असते. अशा अवस्थेमध्ये आत्मा प्रभू प्रेमाच्या अनुभवामुळे या बाह्य जगतच्या भौतिक किंवा क्षणिक आकर्षणापासून दूर रहातो. अशा अवस्थेमुळे आत्मामध्ये एक नवीन ऊर्जेचा संचार होऊ लागतो. त्यामुळे अंर्तमुखतेची अवस्था बनते. त्यामुळे स्वतःला अन्य काहीही प्राप्त करण्याची इच्छा राहू शकत नाही. अशा लवलीन स्थितिमुळे आपण स्वतःला निर्विघ्न बनवू शकतो. वर्तमान वेळी सृष्टिचक्राची अंतिम वेळ असल्यामुळे विभिन्न प्रकारची विघ्न येत आहेत या विघ्नापासून जर स्वतःचा बचाव करावयाचा असेल तर त्यासाठी सर्वांपासून लांब राहण्याऐवजी स्वतःला प्रभू प्राप्तीमध्ये किंवा प्रभू प्रेमामध्ये लवलीन करा. या लवलीन अवस्थेमुळेच आत्म्याची जन्मजन्मांतराची तहान संपेल. जन्मजन्मांतराची विकर्मेसुद्धा नष्ट होतील आणि वर्तमानवेळी निर्विघ्न, दैवीगुणांनी युक्त सुद्धा बनू शकू. अशी लवलीन अवस्था बनविण्यासाठी करावयाचा पुरुषार्थ काय आहे तर तो असा.

**१) परमात्म प्रेमामध्ये मग्न व्हा :** परमात्म्याने या सृष्टिवर अवतरीत होऊन आपल्यावरती जे उपकार केले आहेत. ज्या काही प्राप्ती करविल्या आहेत, जे संगोपन दिले आहे, त्याची मनामध्ये पुन्हा पुन्हा आठवण करा. तो आपल्याला भविष्यामध्ये काय बनवू इच्छितो त्याची आठवण करा. अशा आठवणीमुळेच परमात्माविषयी आपल्या मनामध्ये प्रेम जागृत होईल मन एकाग्र होऊ शकेल. परमात्म्याच्या प्रेममय आठवणीलाच लवलीन अवस्था म्हटले जाते. परमात्म्याच्या प्रेमामध्ये भाव विभोर होणे, हीच खरी लवलीन अवस्था आहे. परमात्म्याच्या स्थूल किंवा सूक्ष्म प्राप्तीचा जो अनुभव झाला आहे त्यामध्ये लीन होणे लवलीन होने यालाच लवलीन अवस्था म्हटलं जाते.

**२) कर्मामध्ये लीनता :** वैज्ञानिक आईन्सटाइनने एकदा एका मित्राला दुपारच्या भोजन करण्यासाठी निमंत्रण दिले होते. सकाळी लवकरच ते आपल्या वैज्ञानिक प्रयोग शाळेमध्ये आणि वैज्ञानिक प्रयोगामध्ये व्यग्र झाले. त्यांचे मित्र वेळेवर भोजनासाठी आले त्यांनी काही वेळ वाटसुद्धा पाहिली. मित्रानी आईन्सटाइनला कर्मामध्ये अधिक व्यग्र पाहून त्याने निर्णय केला की, मी स्वतः भोजन करून निघून जातो. त्याच्या मित्राने त्यांना त्रास देणे योग्य समजले नाही. मित्राने भोजन करून ती खरखटी थाळी टेबलावरच ठेवून तिथून निघून गेले जेणेकरून आईन्सटाइनला समजेल की मित्र भोजन करून निघून गेला. काही वेळानंतर आईन्सटाइनला भोजन करण्याचा विचार आला ते प्रयोगशाळेतून बाहेर आले भोजनालयामध्ये आले टेबलावरती थाळी पाहून त्यांना वाटले की, ओह मी भोजन तर केलेलेच आहे तिथून ते पुन्हा प्रयोगशाळेमध्ये जाऊन प्रयोग करण्यामध्ये व्यग्र झाले.

वरील वृत्तांतावरून आपल्याला हेच समजून घ्यावयाचे आहे की कर्मामध्ये आपली तल्लीनता झाल्यामुळे आपण सर्व काही विसरू शकतो. आईन्सटाईनची इतकी तन्मयता होती की, त्यांना मित्राचाच नाही तर स्वतःच्या भुकेचाही विसर पडे. ही कर्मातील तन्मयता हीच कर्माची खरी एकाग्रता आहे. ही कर्मातील एकाग्रता हीच मानसिक शक्तिला व्यर्थ गोष्टींपासून मुक्त करून आपल्याला लवलीन बनवू शकते. मात्र शिव परमात्मा म्हणतात कर्म करताना मन माझ्या आठवणीत तल्लीन होणे हाच गीतेतील कर्मयोग आहे.

**३) ईश्वरी प्रेम एक शुद्ध कैफ आहे :** ज्याप्रमाणे नशेच्या मुळे व्यक्ति आपली सर्व शुद्ध विसरुन जातो. नशा एक अशी अवस्था आहे. त्यात व्यक्ती वर्तमान, भविष्य आणि भूतकाळ सर्व काही विसरून जातो. त्याचप्रमाणे ईश्वरी प्रेम आपल्या जुन्या स्वभाव, संस्काराला पूर्णपणे विसरून जाते. ईश्वरी प्रेमाच्या नशेमुळे वर्तमान आणि भविष्य सर्व काही विसरून निज आत्मस्वरुपामध्ये, निज सद्‌गुणाच्या स्वरुपामध्ये आपण टिकून राहतो. त्यामुळेच परमानंदांची अनुभूती होऊ लागते. ईश्वरी नशा बाह्य जगाचा, भौतिक जगाचा विसर पाडून आंतरिक आत्म संपत्तीची आठवण करून देते. ईश्वरी नशेमुळे अंतरजगताचा अनुभव होऊन आपण लवलीन बनू शकतो. ईश्वरी नशा चढण्यासाठी स्वमानामध्ये राहण्याची गरज आहे. स्वमानामुळे ईश्वरी नशा चढेल आणि त्यामुळेच आपण लवलीन बनू शकेल.

**४) रचनात्मक कार्य करा :** ईश्वरी प्रेमामध्ये टिकण्यासाठी किंवा लवलीन स्थिति बनविण्यासाठी नेहमी रचनात्मक कार्य करा. रचनात्मक कार्य केल्यामुळे आपल्याला इतरांकडून आशीर्वाद मिळू शकतात. आपल्याला आंतरिक आनंद मिळू शकतो. रचनात्मक कार्यामुळे मन सशक्त बनू शकते. म्हणून शिवबाबा नेहमी सांगतात मुलांनो तुम्ही सेवा करा. काही ना काही नवीन करत रहा. रचनात्मक कार्यामुळेच बुद्धीचा विकास होऊन आपण लवलीन बनू शकतो.

**५) लवलीन बनण्यासाठी विशाल हृदय पाहिजे :** लवलीन बनण्यासाठी देहभानाच्या पलीकडे आत्मिक स्वरुपामध्ये राहण्याची आवश्यकता आहे. आत्मस्वरुपामध्ये टिकणे हीच खरी विशाल हृदयाची भावना आहे आत्मस्वरुपामध्ये राहिल्यामुळे आपण सजणी बनू शकतो आणि परमात्मा साजण पाहून लवलीन राहू शकतो. देहभानामध्ये आल्यामुळे म्हणजेच अन्य आत्म्याच्या सोबतचा जो स्नेह आहे तो सीमित असतो. यासाठी आत्मअभिमानी स्थितीमध्ये राहील्यामुळे ईश्वरी स्नेह, आत्मा आणि परमात्म्याचा स्नेह, संतुष्ट स्थितिकडे घेऊन आपण सहजच लवलीन राहू शकतो म्हणून आत्मअभिमानी बनणे सुद्धा गरजेचे आहे.

**६) लवलीन राहण्यासाठी प्रेममय स्थिति :** संत कबीरदासाने लवलीन बनण्यासाठी अडीच अक्षरे प्रेमाची वाचा म्हणून सांगितले आहे. संत कबीरांनी आपल्या दोह्यांतून सांगितले आहे की, फक्त अडीच अक्षरे प्रेम वाचल्यामुळे, अनुभव केल्यामुळे पंडित अर्थात ज्ञानी बनू शकतो. प्रेम या शब्दाचा खरा अर्थ गवसला, तर मग बाकी वाचणे किंवा समजणे काही गरजेचे नाही. संत कबीरदासांनी खरोखरच तथ्यपूर्ण सांगितले आहे. परमात्म्याचे सुद्धा आपल्याला हेच सांगणे आहे. आपण परमात्म्याच्या प्रेमामध्ये लवलीन रहायचे आहे. बाकी सर्व काही ठीक होत जाईल. म्हणून प्रत्येक ज्ञान मुरली मध्ये शिवबाबा सांगतात तुम्ही माझी आठवण करा. अर्थात लवलीन रहा.

परमाच्या प्रेमामध्ये लवलीन झाल्यामुळे एकाग्रतेच्या द्वारे अन्तर्मनाचा दरवाजा उघडतो. अन्तर्मनामुळे जे अनुभव करतो त्यामुळे अन्तर्मन जागृत होते. त्यामुळे ज्या स्थितीचा अनुभव करू इच्छितो तो अनुभव आपण निरंतर करू शकतो. अशा अनुभवामुळे अन्य भौतिक प्रलोभने किंवा भौतिक पदार्थ आपल्याला तुच्छ वाटू लागतात. त्यापासून वैराग्य निर्माण होतो. यासाठी लवलीन अर्थात परमात्मा लव (प्रेमामध्ये) लीन राहणे गरजेचे आहे.

**७) लवलीन स्थितीसाठी दाता बनण्याची गरज :** परमात्म्याच्या प्रेमामध्ये लवलीन राहण्यासाठी नेहमी इतरांना दाता बनून देण्याचे कार्य करा. इतरांकडून मागण्याची इच्छा करणारा लवलीन राहू शकणार नाही. परमात्मा सुद्धा दाता आहे. परमात्मा दाता आहे त्याचे प्रत्यक्ष प्रमाण ही सृष्टि आहे. इतरांकडून घेण्याची इच्छा करणाऱ्याचे व्यर्थ संकल्प विकल्प चालतात, तो निर्विघ्न बनू शकणार नाही. इतर व्यक्ति मला मान देईल तरच मी देईन. इतर मला संधी देतील तरच मी देईन ही दातापणाची लक्षणे नव्हेत म्हणून दाता बनून सर्वप्रथम मला द्यावयाचे आहे मग कोणी कसा सुद्धा असो मला काही सुद्धा देऊ मला इतरांना चांगलेच द्यायचे आहे अशी दातापणाची स्थिती वालाच लवलीन राहू शकतो.

लक्षात ठेवा जर परमात्म्याचे प्रेम प्राप्त करावयाचे असेल तर बिना डोक्याचे आणि बिना पायाचे बनणे गरजेचे आहे (Become footless & headless) अर्थात परमात्मा निराकार आहे. मला सुद्धा स्वतःला निराकारी आत्मा समजणे गरजेचे आहे. मला माझी स्वतःची काही बुद्धी वापरायची नाही, डोके खपवायचे नाही. जे काही ज्ञान आहे ते परमात्म्याची देणगी आहे. मला माझे डोके नाही. माझ्याजवळ माझे पाय नाहीत अर्थात परमात्मा जे मला श्रीमत देतो, निर्देश देतो त्याचप्रमाणे मला चालायचे आहे. जो मला विचार करावयाचा, समजायचा आहे किंवा निर्णय

(पृष्ठ क्र.२८ वर)

# परीकथा

## (भाग ९)

# सृष्टी रूपी उलटा व अद्भुत कल्पवृक्ष

ब्र.कु. रेखा, देगलूर



परीचे स्वप्नात येणे आणि ज्ञान सांगणे आता अंगवळणी पडत चालले होते.

आम्ही सर्वजण राधेच्या मामाच्या गावी जाऊन परत आलो. बसमध्ये वरद व राधा गावाकडच्या आठवणी काढत मोठ्या आनंदाने सर्व गोष्टी एकमेकाला सांगत होते. राधाचे काका काकू आता परत मुंबईला जाण्यासाठी निघणार होते. परंतु राधा व तिचा दादा एकमेकाला सोडून जाण्यासाठी तयार नव्हते तेव्हा राधाचे काका आणखीन दोन दिवस राहायला तयार झाले. राधा व तिचा दादा खूप खुश झाले दोघांनी खूप धमाल केली ते दोघेही निरागस, हसायचे, खेळायचे भांडायचे पुन्हा सर्व विसरून एकत्र येऊन खेळायचे मला कुतूहल वाटायचं की त्यांच्या भांडणात सुद्धा किती प्रेम होतं त्यांना भांडल्याशिवाय राहवतच नव्हतं आणि एकमेकाशिवाय त्यांना कधी करमत नसे अशी त्यांची गत होती. दोन दिवस मात्र मोठ्या आनंदाने गेले.

त्या दिवशी सकाळी लाल सोनेरी रंगाची सूर्यकिरण आमच्या अंगणात खूप छान दिसत होती. बागेत सूर्य पाहत राधा बसली होती. तिचा दादा तेवढ्यात तिथे आला दोघेही एकमेकांकडून पाहून हसले तिथेच पायरीवर बसून गप्पागोष्टी करू लागले. दादा म्हणाला, ''राधा मी मुंबईला गेल्यानंतर मला मुळीच करमणार नाही बघ. तू येतेस का ग मुंबईला आमच्यासोबत''. राधा म्हणाली, ''नाही आत्ता नाही. आता तर काही दिवसांनी आमच्या परीक्षा सुरू होणार. मग परीक्षा झाली की सुट्टीत आम्ही सर्वजण तिकडे येऊ तू गेल्यावर मलासुद्धा करमणार नाही बघ. मला सुद्धा खेळायला मस्ती करायला माझ्या परीच्या गोष्टी सांगायला.'' एवढ्यात ती एकदम शांत झाली लगेच म्हणाली, ''अरे दादा रात्री की नाही माझ्या स्वप्नात परी आली होती बघ आता मला आठवलं तुला सांगू का रे माझ्या परीची गोष्ट?'' वरद तिला म्हणाला, ''राधा परी तुझ्या स्वप्नात येते; पण आमच्या स्वप्नात येत नाही. तुला परी दिसते, आम्हाला दिसतच नाही बघ.'' तो थोडासा हिरमुसला झाला होता, यावर राधा म्हणाली, ''दादा तू पण शिव परमात्म्याची आठवण कर म्हणजे ते तुझ्यासाठी सुद्धा एक परी पाठवतील तुझ्याही स्वप्नात येऊन परी गोष्ट सांगेल बघ.'' यावर दादा म्हणाला, ''हो राधा आता मी सुद्धा रोज शिव परमात्म्याची आठवण करेन मग माझ्यासाठी सुद्धा शिवबाबा एक सुंदर परी पाठवतील बघ. पण तुझी गोष्ट सांग ना.'' राधा म्हणाली, ''दादा परी आली ना तेव्हा मला येताना कोणता तरी खूप छान गोड रस तो रस खूपच छान होता. मी रस प्यायले मग ती गोष्ट सांगण्यासाठी सुरुवात केली. परी म्हणाली, ''राधा मी तुला अद्भुत कल्पवृक्षाची गोष्ट सांगणार आहे. बाळ आपण जे वृक्ष लावतो त्यांची मुळं जमिनीत जातात व कोंब फुटतो मग त्याला फांद्या फुटतात, त्याचे खोडात रूपांतर होते असा वृक्ष असतो परंतु मनुष्यसृष्टीरूपी झाड मात्र उलटा वृक्ष दाखवलेला आहे.'' राधा म्हणाली, ''अगं उलटा वृक्ष? असं कसं?'' परी सांगत होती, ''राधा झाड लावण्यासाठी बी जमिनीत पेरतो मग त्याला सुरुवातीला दोन सुंदर कोवळी पाने येतात मग हळूहळू फांद्या खोड अशाप्रमाणे झाड वाढते. पूर्ण झाल्यावर तो मोठा वृक्ष होतो त्याचप्रमाणे हा कल्पवृक्ष सुद्धा असाच आहे. या कल्पवृक्षाचे बीज म्हणजेच शिव परमात्मा वर आहेत आणि त्याची जी दोन पानं फुटतात ते म्हणजे सत्ययुगकालीन श्रीकृष्ण व श्रीराधा. झाडाच्या मुळाशी ब्रह्माबाबा जगदंबा सरस्वती व काही ब्राह्मण ब्राह्मणी राजयोग तपस्या करत बसले आहेत. ह्या कलियुगात म्हणजेच अज्ञानरूपी अंधकारात ज्ञानसागर परमात्मा म्हणजेच शिव परमात्मा सृष्टीचे बीजरूप निराकार स्थितीत

असल्यामुळे प्रजापिता ब्रह्माच्या शरीरात अवतरीत होऊन ब्रह्माच्या मुखाद्वारे ते संगमयुगात सत्य गीता ज्ञान व सहज राजयोगाचे शिक्षण देतात.''

मी परीला म्हणाले, ''या उलट्या मनुष्य सृष्टी रूपी कल्पवृक्षात बरंच काही रहस्य दडलेलं आहे हे मला माहीतच नव्हतं बघ.'' परी म्हणाली, ''बाळा प्रजापिता ब्रह्माच्या मुखाद्वारे सत्य ज्ञान ऐकून ब्राह्मण तयार झाले. या युगाला 'पुरुषोत्तम संगमयुग' किंवा 'गीता युग' असे म्हणतात. बाळ राधा या सृष्टीतील अति गुह्य रहस्य मी तुला आज सांगणार आहे. जेव्हा कलियुगाचा पूर्ण विनाश होईल त्यानंतर एक स्वर्णिम युग, सत्ययुग येईल.'' मी आश्चर्याने पाहतच राहिले. मी म्हणाले, ''अग परी, स्वर्णिम युग म्हणजे सोन्याची दुनिया खरंच येईल का ग?'' परी म्हणाली, ''हो बाळा! तिथे एक पवित्रता हाच धर्म असेल, दैहिक धर्म हिंदू-मुसलमान असा भेदभाव नसेल. एक भाषा असेल. मनुष्यात्मा दैवी गुणयुक्त असल्याने त्याला देवत्व प्राप्त असेल. सर्व भौतिक सुखे पायाशी लोळण घेत असतानाही विकाराचा लवलेशही नसेल.

बाळा दुधा-तुपाच्या नद्या असतील. प्रत्येकाच्या घरासमोर सुंदर बाग ,शेती-वाडी असेल. तेथील जमीन सुपीक असेल. अशा जमिनीचे वर्णन शास्त्रात 'आकृष्टपश्चा' असे केले आहे. बाळा ते राज्य म्हणजे सत्ययुगातील श्रीलक्ष्मी श्री नारायण यांचे अखंड निर्विघ्न आणि अति सुखकारी असे राज्य! आणि हो बाळा तिथे गाय आणि वाघ एकाच घाटावर पाणी पीत असत. म्हणजेच ते अहिंसक राज्याचे ते प्रतीक आहे. त्या काळात संपूर्ण पवित्रता त्यामुळे सर्व भारतवासी सदा स्वस्थ, सदा धनवान, सदा सुखी असतात. तिथे काम- क्रोध विकार, हिंसा दुःख अशांती इत्यादी याचा लवलेशसुद्धा राहणार नाही. या युगाला स्वर्ग वैकुंठ सुखधाम किंवा हेवन असं म्हणतात. ते सर्व जीवनमुक्त १६ कला संपूर्ण आणि त्यांचे सरासरी आयुष्य दीडशे वर्षेहोते. तिथे बाराशे पन्नास वर्षे सत्ययुगी देवतांचे राज्य होते.'' मी परीचे हात हातात घेऊन अगदी जवळ जाऊन म्हणाले, ''परी किती छान! इथे सोन्याचे राजवाडे आपल्या भारतातच होणार हो ना मी आश्चर्याने पहात राहिले परी म्हणाली, ''हो बाळा इथेच सोन्याची दुनिया होणार हे सत्ययुग झाल्यावर मग त्रेता युग १२५० एवढाच काळाचा इथे श्रीसीता व श्रीराम चंद्रवंशी घराणं १४ कला संपन्न निर्विकारी राजे होते. सत्ययुग हे मनुष्य सृष्टीरुपी वृक्षाचं खोड आहे. या खोडापासून नंतर हळूहळू अनेक धर्मरूपी फांद्या निघाल्या. सुरुवातीला इब्राहिमद्वारे इस्लामची स्थापना झाली. त्यानंतर गौतम बुद्धांनी बौद्ध धर्म स्थापन केला. असे अनेक धर्म-मठ-पंथ वाढतच गेले. प्रत्येक धर्मात्म्याचा प्रयत्न होता, या सृष्टीवर ऐक्य, समता, बंधुभाव यावा. मानवाचे दुःख दूर व्हावे. पण जितक्या व्यक्ती तितक्या प्रकृती याप्रमाणे भेदभाव वाढतच गेला. विकारांचे प्राबल्य वाढतच गेले. तिसऱ्या युगापासून म्हणजे द्वापर युगापासून. आपण सर्व देहाभिमानामुळे काम, क्रोध, मोह या विकारामुळे सर्वत्र दुःख अशांती पसरली आणि दैवी स्वभावाचं आसुरी स्वभावात परिवर्तन झालं. सर्व दैवी गुण विसरले. सर्व मनुष्य झाले व सर्वत्र पूजाभक्ती सुरू केली. ऋषीमुनी शास्त्र पुराणे लिहू लागले. यज्ञ इत्यादी सुरुवात झाली. मी म्हणाले, ''परी मला एवढं समजलं की पूर्वीचा काळ खूप छान खूप सुंदर होतं.'' परी म्हणाली, ''हो पुढे कलियुग बाराशे पन्नास वर्षांचा हा काळही आता संपत आला आहे. देव-देवताच्या पूजेव्यतिरिक्त सूर्य, चंद्र, पिंपळ, वड, जल, वायू अशा तत्त्वांची पूजा मनुष्य करू लागला. सगळे एकमेकाला दुःख अशांती देऊ लागले. बाळा कलियुगाच्या अंती सर्व मनुष्य आसुरी वृत्तीचे बनले, त्यामुळे सत्ययुग, त्रेतायुगाला स्वर्ग व द्वापर व कलियुगाला नर्क असे म्हटले आहे.'' मी परीच्या गोष्टी मन लावून ऐकत होते. परी थोडा वेळ थांबली व एक हलका श्वास घेऊन पुढे बोलू लागली, ''बाळ राधा तुला समजलं ना ह्या कल्पवृक्षाचं गुह्य रहस्य?'' मी परीला म्हणाले, ''परी मला एवढं समजलं की यासृष्टीवर आता नवीन सुवर्ण सृष्टी येणार.'' मी एवढं बोलले पण लगेच परी दिसेनाशी झाली. दादा आपण बाबांना विचारूया

आम्ही धावत दोघेही बाबांजवळ गेलो. बाबा पेपर वाचत होते. मी बाबाच्या अगदी मांडीवर जाऊन बसले बाबांना विचारलं, ''बाबा, आज परीने मला एक कल्पवृक्षाची कथा सांगितली.'' राधा बाबाला तिच्या गोड शब्दात परीची कथा सांगत होती. राधा गोष्ट संपल्यावर म्हणाली, ''बाबा भारतात खरंच सत्य सोन्याची दुनिया येणार का हो!'' तिचा दादा लगेच म्हणाला, ''काका तेथे हिऱ्या-मोत्याचा आपल्याला प्रकाश मिळेल का? दही-दुधाच्या नद्या पण राहणार आहेत का?'' बाबा म्हणाले,

''हो बाळांनो हे सर्व सत्य आहे. भरपूर प्रमाणात दूध तूप मिळेल. बाळा आपण सर्वजण एक गीत म्हणतो. 'जहाँ डाल डाल पर सोनेकी चिडीया करती है बसेरा वो भारत देश है मेरा.' म्हणजे भारत हा पूर्वी सोन्याचा देश होता. स्वर्णिमयुग असं म्हणतात, त्याला. बाळा त्या युगाबद्दल तुला परीने सांगितलं आहे. शिव परमात्मा नवसृष्टीची रचना करण्यासाठी माध्यम म्हणून ब्रह्माबाबांची निवड प्रथम करतात. मग त्यांना माध्यम बनवून इतरांना ज्ञान देतात म्हणजेच ब्राह्मण बनवितात. ब्रह्मा बाबांच्या द्वारे हे सर्व कार्य करून घेतात. जे दिव्य अनुभव ब्रह्माबाबांना झाले त्या अनुभवावरून ब्रह्मा बाबांनी ठरवलं की सर्व मनुष्य आत्म्यांना चांगले संस्कार आचरणात आणण्यासाठी मला स्वतःला माझ्यात परिवर्तन करून जगापुढे आदर्श ठेवला पाहिजे. १९३६-३७ ला या महान कार्याला सुरुवात झाली.'' राधा म्हणाली, ''बाबा खरंच आहे, आपण स्वतः बदलायला पाहिजे तरच आपण दुसऱ्याला बदलू शकतो.

आपल्यामध्ये ही शक्ती येते. बाबा मी सुद्धा आता चांगले संस्कार चांगले विचार आचरणात आणण्याचा प्रयत्न करत राहणार. हो ना रे दादा तू पण करणार ना!'' बाबा आम्हा दोघांनाही अगदी जवळ घेऊन म्हणाले, ''हो बाळांनो आधी आपल्यामध्ये बदल आणायचा मगच नंतर दुसऱ्याला बदलण्याचा प्रयत्न करायचा. आपल्या भारतात खूप छान संस्कृती आहे. ही भारतभूमी ही पुण्यभूमी म्हणून ओळखली जाते. म्हणूनच शिव परमात्मा आपल्या भारतातच येतात.'' दोघेही खूप खुश झाले ते बाहेर खेळण्यासाठी निघून गेले मी काम करत हे सर्व ऐकत होते. माझ्या मनात परमात्म्याबद्दल दोन ओळी सुचल्या -

सद्गुरु तूच खरा आधार या जीवनाचा
तूच तारुन नेशी या जीवना
तूच माझा शिव परमात्मा
तूच करी नाश अज्ञानतिमिराचा
हाच आशीर्वाद सद्गुरूंचा

आम्ही सर्वजण बाबाच्या आठवणीत कामाला लागलो.

***

---

(पृष्ठ क्र.४ वरुन)

लावायची व त्यात भरीस भर म्हणून पत्रकारांनाही पाचारण केले होते म्हणजे ही घटना वर्तमानपत्रांद्वारे सर्वदूर पसरेल.

मम्मांनी सभागृहात प्रवेश केला. सभागृहातील सर्वांना आत्मिक दृष्टीने बघितले व आपल्या जागेवर जाऊन बसल्या. मम्मांच्या दृष्टीने सर्व जनमानसावर अशी मोहिनी घातली की आलेल्या लोकांना वाटलं आपण यांचं बोलणं निदान ऐकूयात तरी ! त्यानंतर मम्मांनी जे भाषण केलं त्यामुळे सर्वजण मंत्रमुग्ध झाले. मम्मांकडून त्यांच्या सर्व शंकांचं समाधान होत होते. मम्मांनी सभा जिंकली. झालं! दुसऱ्या दिवशीच्या सर्व वर्तमानपत्रांतून मम्मांच्या कार्यक्रमाची वाहवा झाली. तोपर्यंत ब्रह्माकुमारी संस्थेला अशी प्रसिद्धी कधीच मिळाली नव्हती. हा होता मम्मांच्या अमोघ वाणीचा व योगयुक्त स्थितीचा चमत्कार!

असो, मम्मांच्या बाबतीत सांगायचं झालं तर 'राते बीत जायेगी पर बाते खत्म नही होगी!' तूर्तास इथेच थांबतो.

**(भावानुवाद ब्र.कु. प्रणिता, पर्थ ऑस्ट्रेलिया)**

***

---

(पृष्ठ क्र.१३ वरुन)

व्हि. आय. पी. शिबीर होते. त्या शिबीरासाठी आमच्या गावातील प्रतिष्ठित नागरिक श्री. मारुतीराव मेडसिंगे गेले होते. शिबीर करून आल्यावरोबर त्यांनी मला सांगितले, ज्योतिर्लिंग मंदिरातील तळघरात वीस फूट बाय पंचवीस फूटाचा आर.सी.सी. हॉल आहे. तो तुमच्या ब्रह्माकुमारीच्या क्लाससाठी देण्याची मी व्यवस्था करतो.

त्यांचा मुलगा श्री. आनंदराव मेडसिंगे त्यावेळी सरपंच होता. त्याला त्यांनी सांगितले, ज्योतिर्लिंग मंदिरातील ती जागा ब्रह्माकुमारी यांना कायमस्वरूपी विनाभाडे तत्वावर देत आहोत असा ग्रामपंचायतचा ठराव करा. मग तो तसा ठराव सरपंच व ग्रामपंचायत सदस्यांनी करून ती जागा आमच्या ताब्यात दिली. जवळपास वीस वर्षे आमचा क्लास याच ठिकाणी भरतो. एखाद्या सेंटरसारखा तो सुसज्जित आहे. पंचवीस भाऊ बहीण दररोज क्लासला येतात. जवळ मंदिर असल्याने वातावरण एकदम प्रसन्न आहे.

शेवटी बाबांनीच दिली पाठशाळेला जागा. माझा पाठीराखा मला असा वाऱ्यावर सोडेल कसा? उशीर होईल पण कसूर होणार नाही. बाबांवर रूसून बसलो म्हणून बाबांना धावत यावे लागले. अंतःकरणापासून बाबांकडे एखादे मागणे मागितले तर बाबा ते पूर्ण केल्याशिवाय राहत नाही. ओम शांति !!

***



# तणावमुक्त रहा

ब्र.कु. चंद्रशेखर, शांतिवन

बरेच आजार हे सायकोसोमॅटीक अर्थात मानसिक विकृतीमुळे निर्माण झालेले असतात. असे मेडिकल सायन्समध्ये सिद्ध झालेले आहे. त्यामुळे आपल्या मनाला आपण योग्य दिशा देऊन सुदृढ जर केले, तर आपले जीवन सुखी, संपन्न व तणावमुक्त होऊ शकते यासाठी फक्त खालील काही बाबींचा विचार करावा. जीवनात घडलेल्या प्रत्येक घटनेकडे सकारात्मक दृष्टीने पहावे. श्रीमद् भगवद्गीता सांगते जे झाले ते चांगल्यासाठी झाले. या प्रमाणे प्रत्येक घटना वरकरणी अहितकारी जरी वाटली तरी त्यात खूप मोठे कल्याण सामावलेले असते. भूतकाळातील चुकांचा पश्चाताप करू नये आणि भविष्याची विनाकारण चिंताही करू नये. त्यापेक्षा ही विचार शक्ती व वेळ वर्तमानकाळ यशस्वी करण्यासाठी वापरावा. भूतकाळातील चुकांतून धडा शिकावा. परंतु पुन्हा पुन्हा तेच ते चिंतन करणे म्हणजे त्या परिस्थितीला आवाहन करणे होय. तेच चिंतन करून फायदा होणारच नाही. पण हाती घेतलेले कार्यही, बिघडेल. प्रत्येक घटना ही आपली शिक्षक आहे. आजचा दिवस आपल्या हातात आहे. जर आपण रचनात्मक कार्य करून कालची चूक भरून काढली तर भविष्यात पश्चाताप होणार नाही. साधारणपणे मनुष्य ६० टक्के विचार भूतकाळाबद्दल व ३५ टक्के विचार भविष्यकाळाबद्दल करतो. त्यामुळे आपल्या विचारशक्तीचा ऱ्हास होऊ लागला. छोट्या छोट्या प्रसंगाला आपण घाबरून जातो व टेन्शनमध्ये येतो.

हे जग एक विशाल नाटक आहे. मनुष्य या नाटकातील एक नट आहे. अभिनय म्हणजे कर्म उत्कृष्टरितीने पार पाडत आहे. तेव्हा दुसऱ्याला पाहून चिंता करण्याचे काहीच कारण नाही. जेव्हा आपण एखादा सिनेमा पाहत असतो तेव्हा तो साक्षी होऊन पाहतो. कोणी कितीही वाईट पात्र असेल. खलनायकी करणारा असेल; पण आपल्याला माहीत असते की, हे नाटक आहे. या कथानकात याची भूमिकाच अशी आहे. निर्माता, लेखक यांनी सांगितल्याप्रमाणे तो आपले कार्य पार पाडीत आहे. किंवा ही परिस्थिती एखाद्याकडून कार्टून शोप्रमाणे आहे असे पाहण्याचा प्रयत्न करून बघा. यातून ताणवमुक्त होता येईल.

***

---

(पृष्ठ क्र.१४ वरुन)

आपल्या जीवनात आपलेसे करून, न थकता अनेक मनुष्यात्म्यांची बापदादांशी गाठ घालून देऊ तसेच जे आधीच बापदादांचे बनलेत, त्यांना संगोपन देत, लवकरात लवकर संपूर्ण बनवायला, संपन्न बनण्यास मदद करायची आहे.

आपले आदिरत्न अर्थात या मार्गातील पूर्वज आपल्या सर्वांकडून हेच इच्छितात की, आपण सर्वजण लवकरात लवकर परिपूर्ण व्हावे, ज्यामुळे ह्या गलितगात्र सृष्टिचे परिवर्तन होईल. हीच आदरणीय दादीजींना खरीखुरी मन:पूर्वक श्रद्धांजली असेल. आपण सर्वजण दादींच्या इच्छा पूर्ण करू या आणि आपल्या जीवनाद्वारे अनेक मनुष्यात्म्यांना त्याचा फायदा करवून देऊ.

***

**सुविचार**

जीवनातल्या नित्यक्रमांचे जेव्हा उत्सव होतात, तेव्हा आयुष्य आनंदयात्रा होते. – साने गुरुजी



# बकुळफुले


ब्र.कु. मेघना, नाशिक

सन २००० डिसेंबर महिन्यातील गोष्ट आहे. आपण इंग्लंडला जावे असा कधीही विचार केला नव्हता. अथवा माझे ते कधीही स्वप्न नव्हते आणि अचानक मला जणू काही बाबांनी प्रेरणा दिली. मी माझ्या इंग्लंडच्या मैत्रिणीला (ग्रीटाला) ईमेल पाठवला, फक्त तिची विचारपूस करायला आणि मला तिचा लगेच मेल आला, मेघनाबेन मी खूप खूप विचलित झाले आहे.. मला ते वाचून धक्का बसला. आणि मला वाटले, बाबांना सांगावे. तिला मदतीची गरज आहे. काय  करायचे. मग मी तिला विचारले काय झाले? ती म्हणाली, माझे पती अचानक हार्ट अटॅकने गेले. माझ्या २ लहान मुली आहेत, शाळेत  जाणाऱ्या. ती म्हणाली मी तुझी खूप आठवण काढत होते. पण संपर्क करण्याचे काही साधन नव्हते इमेलव्यतिरिक्त. तेव्हा माझ्याकडे  फोन पण नव्हता. अशा वेळी माझा मेल तिला देवाने पाठवला असे वाटले.

तिची थोडक्यात ओळख म्हणजे ती सन २००० मधे ठाण्याला आली होती, तिची आई गेली म्हणून. त्यावेळी तिला कोणीतरी आपल्या सेन्टरवर जाण्याचा सल्ला दिला आणि ती आली. त्याकाळी मी ठाण्यात अधिक काळ राहत असे व तिथल्या सेवाकेंद्रावर नित्य जात असे. त्यावेळी लतिकादीदींनी तिचा कोर्स करायला मला सांगितले (कोर्स इंग्लिश मधे करायचा होता) ७ दिवस कोर्स केला, तिला बरे वाटले. ती परत इंग्लंडला निघून गेली. आणि नंतर, माझा तिचा  संपर्कही झाला नाहीं. आणि अचानक तिच्या पतीच्या निधनाची बातमी देणारा ई –मेल यावा. अचानक मनात आले मी तिकडे असते तर तिला बाबांची मदत मी पोहोचवली असती. माझ्या पतीला मी सांगितले आणि आम्हा दोघांच्याही मनात आले  मी तिकडे जावे. मला त्यावेळी व्हिसा कसा घ्यायचा, परकीय चलन कुठे मिळते.. वगैरे... काहीही माहीत नव्हते. बाबांना मी मनोमन सांगितले. तू मला मार्गदर्शन कर आणि मग सगळी माहिती गोळा करायला सुरुवात केली. व्हिसा कार्यालयाचा पत्ता शोधण्यापासून सुरुवात. मग एकूण एक माहिती गोळा केली आणि २ दिवसात मी व्हिसा कार्यालयात पोहोचले. व्हिसा मुलाखतीसाठी अर्ज भरायचा होता. त्यात पहिलाच प्रश्न. कुठल्या भाषेत मुलाखत देणार. मी विचार केला आता इंग्लंडला तर फक्त इंग्लिश भाषा म्हणून मी इंग्लिश भाषा निवडली. समोर इंग्लिश माणूस मुलाखत घ्यायला बसला होता. बाबांना सांगितले तू माझ्यावतीने काय बोलायचे ते बोल.

माझ्या मते मुलाखत चांगली झाली. फक्त अर्ध्या तासात व्हिसा मिळाला की नाहीं ते कळणार होते. त्या वेळी माझ्या अगोदरच्या ३ जणांना व्हिसा नाकारण्यात आला होता. मी बाबाला सांगितले माझ्या जाण्याने  तिकडे कुणाचे भले होणार असेल तरच मला तिकडे जाऊ दे. नाहीतर  मी इथे खूप आनंदात आहे.. आणि लगेच मला खिडकीजवळ बोलावून पासपोर्ट दिला आणि मला व्हिसा मिळाला होता. मग कांय. बाबांना अगणित धन्यवाद देऊन घरी आले. तो दिवस होता २९ डिसेंबर २०००. मला खूप इच्छा होती. नवीन  वर्षाच्या ३१ डिसेंबरच्या बाबा मिलनाच्या वेळी मी तिकडे असावे. आणि मग खूप पटापट सगळी  तयारी करावी लागली. तिकीटपण मिळाले. आणि विश्व नाटकातील अद्भुत नोंदीनुसार मी लंडनला पोहोचले. हीथ्रो विमानतळावर ग्रीटाबेन मला घ्यायला आली होती. सगळे कसे स्वप्नवत वाटत होते. बाबा सतत बरोबर आहे, हे खरोखर अनुभवलं. ३१ डिसेंबरला तिकडच्या मुख्य सेंटरला आम्ही दोघी गेलो. माझा आनंद गगनात मावत नव्हता. इंग्लंड म्हणजे दादी जानकी एवढे एकच समीकरण डोळ्यासमोर होते. खरोखरच मी कल्पवृक्षाखाली बसल्याप्रमाणे मला दादी जानकींच्या मागची सीट मिळाली.

(पृष्ठ क्र.२८ वर)



# पसायदान

(भाग – २)

ब्र. कु. ज्ञानेश्वर, पुणे

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींच्या पसायदानावर आपण चर्चा करायला घेतली आहे. परंतु काहींना पसायदान काय आहे याबाबत कदाचित कमी कल्पना असेल. जे मराठी जाणत नाहीत किंवा शिक्षणाचे माध्यम इंग्रजी असल्याकारणाने मराठी साहित्याची ओळख कमी असू शकते. त्यांच्यासाठी पसायदानावर चिंतन होणे जरुरी आहे. पसायदानाचे मराठीत दोन अर्थ निघतात. एक आहे प्रसाद. भगवंताला आपण भोजन अर्पण करतो, संपूर्ण समर्पण भावाने. तो पूर्ण प्रसाद भगवंत काही खात नाही. फक्त प्रसादातील भाव तो जाणतो. म्हणजे या ज्ञानेश्वरीतील ९००० ओव्या म्हणजेच हिंदीत चरण म्हणतात, त्यातील नऊ ओळी. त्यात ९००० ओव्यांचे सार आहे. दुसरा अर्थ आहे पसायदान म्हणजे मागणे. परंतु हे मागणे म्हणजे याचना नाही. हे मागणे म्हणजे मुलगा पित्याकडे मागतो तसे. हक्काने. परंतु हे मागणे कुणासाठी? ना माझ्या प्रदेशासाठी, ना देशासाठी, तर हे मागणे आहे विश्वासाठी. म्हणून ज्ञानेश्वरांना 'माउली' म्हणतात. बऱ्याच जणांना आश्चर्य वाटेल संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर एक पुरुष होते. आणि माउली कोणाला म्हणतात तर आईला किंवा स्त्रीला. परंतु या संतास आपण माउली म्हणतो. ह्या माउलींनी काय मागितले आहे? मागणे ही सुद्धा एक कला आहे. आणि ह्याची सुद्धा एक छोटीशी गोष्ट आहे.

एक माणूस काम करत होता. आणि काम करता करता तंबाखू मळत होता. तंबाखू मळताना हा विचार करीत होता की माझं आयुष्य खूप व्यर्थ आहे. काय माहीत परमेश्वर आहे की नाही? आणि जर असेल आणि माझ्यासमोर आला तर मी काय मागू? हा विचार त्याच्या मनात चालूच होता, तेवढ्यात त्याच्यासमोर परमेश्वर प्रकटला. त्याने सांगितले तुला जे काही पाहिजे ते माग. जेव्हा आपली मानसिक तयारी नसते आणि अचानक जर कोणी सांगितले, तर आपण संभ्रमात पडतो. त्या माणसाचेपण असेच झाले. त्या क्षणाला तंबाखू आणि चुना सुकून गेला होता त्यामुळे अनवधानाने त्यांनी सांगितले की हा चुना सुकला आहे तो ओला व्हायला पाहिजे. झाले.

मथितार्थ हा आहे की काय मागावे याची सुद्धा समज आणि पोच पाहिजे.

अशीच एका मातेची कथा आहे. त्या मातेचा पती आंधळा होता. गरीब होता. आणि भगवान त्यांच्यासमोर प्रकट झाले आणि मातेला विचारले, की माग तुला काय हवे ते. काय पाहिजे? एकच वर मिळेल. माता म्हणाली, भगवंता, मी आणि माझे पती दोघांनाही आपल्या नातवाला स्वतःच्या हातांनी, माझ्या पतीचा राजमुकूट, त्यांच्या मुलाद्वारे नातवाने परिधान करताना पाहायचा आहे.

यामध्ये त्या गरीब अंध जोडप्याला काय काय मिळाले, मुलगा मिळाला, गरिबी दूर झाली, राज्यभाग्य मिळाले आणि दृष्टी पण मिळाली.

तर असे मागण्याची समज आणि ज्ञान, दूरदृष्टी माऊलींकडे पाहायला मिळते. माऊलींनी पसायदानामध्ये भगवंताकडे काय मागितले आहे? प्रत्येक शब्दात दूरदृष्टी आहे. या धरतीवर स्वर्ग अवतरण्यासाठी माउलींनी भगवंताकडे मागणे केले आहे. हेच पसायदान. कसे मागितले? याची पुढील भागांमध्ये चर्चा करू.

***

**सुविचार**

आपण शरीररूप आहोत हा भ्रमच वाईटाचे मूळ आहे. मूलभूत पाप जर कोणते असेल तर ते हेच होय. – स्वामी विवेकानंद



# गरजा कमी करा

वैद्य सुविनय दामले

वैद्य सुविनय दामले, एक प्रथितयश आयुर्वेदाचार्य आहेत. महाराष्ट्रातील मुंबई, कुडाळ प्रांतात व इतर अनेक ठिकाणी ते रुग्णांवर उपचार करतात. आयुर्वेदावर त्यांचे सखोल चिंतनही आहे. 'आरोग्य रहस्य' या उत्कृष्ट ग्रंथाची निर्मितीही त्यांनी केली आहे. त्यात अनेक सोपे घरगुती उपाय, दैनंदिन आयुष्य वा दिनचर्या, ऋतुचर्या, तसेच आरोग्यविषयीच्या चुकीच्या कल्पनांवरही त्यांनी लेखन केले आहे. राजयोगाभ्यासाच्या सोबत शरीरस्वास्थ्यही आवश्यक आहे. म्हणून ही लेखमाला सुरू करत आहोत. साधकांना उपयुक्त अशी माहिती ते खुसखुशीत शैलीत देतात. या ग्रंथातील छान छान लेख आपण जसे जमेल तसे प्रकाशित करणार आहोत. सुविनयजींनी विना मोबदला त्यांचे लेखन प्रकाशित करायला अनुमती दिली याबाबत अमृतकुंभतर्फे त्यांचे मनोमन आभार आणि त्यांच्या रुग्णचिकित्सेला उदंड यश लाभो हीच सदिच्छा. आम्ही सदैव त्यांचे ऋणी आहोत. – संपादक

गावाकडे चला म्हणजे शहराला गाव बनवा असं नाही. गावाकडे चला म्हणजे खेडवळ गावंढळ बना असं नाही. गावाकडे चला, म्हणजे विशेष ज्ञान–विज्ञान–नाकारणं नव्हे.

**शहरीकरण म्हणजे नेमकं काय ?**

गरजेपेक्षा अधिकाच्या मागे धावणं.. विकासाच्या नावानं घरात घुसलेले यांत्रिक जग... विसरत चाललेले आरोग्याचे सिद्धांत... लोप पावत चाललेली माणुसकी.. आणि नको ते सांभाळले जाणारे स्टेटस् !

What is status?
Spending money....
Which we don't have !
To buy things....
Which we don't need!
To impress the people..
Whom we don't know !

आपल्याला हवं ते सांभाळून, नको ते काढून टाकायला तर काहीच हरकत नाही. (अनावश्यक यांत्रिकीकरण गावाकडं सरकत चाललंय... गावाचं गावपण हरवत चाललंय) शेवटी महत्त्वाचे आहे ते आपले आयुष्य. त्यातील प्रत्येक क्षणाचा मनमोकळा आनंद घ्यायचा ! मिळालेल्या बेभरवशी, तुटपुंज्या आयुष्यातील अडथळे पार करीत जाणं याला जीवन ऐसे नाव ! मग गाव काय आणि शहर काय? गरजा कमी करणं महत्त्वाचं. गरज दोघांचीही आहे. फक्त युक्तीनं कोणाला किती गोंजारायचं ?


It is the question !
खरे बोलणे का सोडावे वाटूनी जनात लाज
जाण असोनी 'सोने' टाकूनी कशास धरसी 'काच' !

***

(पृष्ठ क्र.१७ वरुन)

मला सखोल जाणीव झाली, फक्त या नेत्रांनी नाही, तर बुद्धीच्या नेत्रांनी देखील मला बघावे लागेल. तरच सूक्ष्म गोष्टी टिपता येतील आणि आत्मपरिवर्तनाचा मार्ग सुकर होईल. म्हणून तर गीतेच्या तत्त्वज्ञानात तो म्हणतो, 'गोष्टी सांगेन युक्तीच्या चार' अशा ज्ञानसागर, प्रेमळ बाबांच्या प्रत्येक कर्माबद्दल कितीतरी बोलता येईल आणि त्यातून शिकता येईल.

***



## चिंतन

# खरे पुण्य

ब्र.कु. पुष्पा, नाशिक

आपल्या भारतीय संस्कृतीत ३३ कोटी देवांचे वर्णन आढळते. त्या सोबतच देवात्मा, धर्मात्मा, महात्मा पुण्यात्मा, पापात्म्याचा सुद्धा उल्लेख आढळतो. हे सर्व आत्म्याचे प्रकार कसे तयार झाले हे समजून घेणे महत्वाचे आहे.

प्रत्येक शरीरामध्ये एक चैतन्यशक्ती, आत्मा विराजमान असते. आत्मा आपल्या या नश्वर शरीराद्वारे आपले कर्म करत असतो. मात्र भूतलावर त्या आत्म्याचे पुनरपि मरणं पुनरपि जननं.. या उक्तीप्रमाणे पुनःपुन्हा पुनर्जन्म होत असतात. या पुनर्जन्मामध्ये आपल्या स्थितीनुसार आपल्यातील पवित्रतेच्या शक्तीनुसार आत्मा आपले जन्म घेत असतो. यातूनच देव आत्मा, धर्मात्मा, पुण्यात्मा, महात्मा, आणि पापआत्मा असे पाच प्रकार आत्म्याचे पडतात. मात्र या सर्वांहून भिन्न असा परमात्मा आहे. जो कधीही या उपरोक्त पाच गोष्टींमध्ये समाविष्ट होत नाही किंवा कोणताही आत्मा कधीही परमात्मा बनू शकत नाही. याचा अर्थ परमात्मा हा स्थायी आणि एकच निराकार आहे. प्रत्येक आत्मा हा आपआपल्या स्थितीनुसार व कर्मानुसार वेगवेगळ्या अभिनयातून आपला कर्म करीत असतो. यातील देव आत्मा यांचा कार्यकाळ सत्ययुगापासून सुरू होतो. जेव्हा संपूर्ण सृष्टी सत्वप्रधान असते, पवित्र असते त्यालाच आपण स्वर्ग, हेवन वैकुंठ परीस्थान अशा शब्दांनी संबोधतो. अशा पवित्र दुनियेमध्ये आत्मा आपला अभिनय करीत असतो. त्यावेळेस त्यांना आपण देव आत्मा असे संबोधतो. पुढे वेगवेगळ्या धर्मांची स्थापना होते आणि या धर्मांची स्थापना करणारे जे आत्मे असतात त्यांना धर्मात्मा म्हटले जाते. इस्लाम धर्माची स्थापना करणारे इब्राहिम, बौद्ध धर्मांची स्थापना करणारे गौतम बुद्ध तर शीख धर्मांची स्थापना गुरू नानक देव यांना आपण धर्मात्मा संबोधतो. पापकर्म हे आपल्या बऱ्यावाईट काळात तसेच संकटसमयी आडवे येत असतात. मनुष्यातील सकारात्मक कर्माच्या प्रभावामुळे स्वतःचे भले होतेच, परंतु समाजातील लोकांना सुद्धा याचा लाभ मिळत असतो. त्यामुळे पुण्यकर्म करणाऱ्या व्यक्तींना पुण्यात्मा संबोधतात त्याच प्रकारे समाजाची सेवा करणारे व मनुष्य आत्म्यांना चांगली स्थिती प्राप्त करून देण्यासाठी नेहमी झटणाऱ्यांना महात्मा असे म्हटले जाते. त्यांनी केलेल्या महान कामातूनच एक नव समाजाच निर्माण होत असतो. त्यामुळे समाज त्यांना नेहमीच महात्मा म्हणून स्मरण करत असतो. यापैकीच आपण महात्मा ज्योतिबा फुले, महात्मा गांधी आदींचा उल्लेख करू शकतो. मात्र या सर्व चांगले कार्य करणाऱ्या आत्म्यांपेक्षा विपरीत कार्य करणारे किंवा वाईट कर्म करणाऱ्यांना आपण पापात्मा असे संबोधतो. जे लोक नेहमी वाईट कामाशी संलग्न असतात. आपल्या वाईट विचारांनी ते स्वतःचे तर नुकसान करतात परंतु समाजाचे सुद्धा भले ते चिंतीत नाहीत. त्यामुळे असे लोक पाप कर्माची फळे चाखतात, असं आपण समजतो. निराकार परमात्मा कधीही या पाच प्रकारत कधीच समाविष्ट होत नाहीत. मात्र परमात्मा हे नेहमीच अजन्मा निराकार आहेत. परमात्मा स्वयंभू आहेत. वरील पाच प्रकारचे आत्मे हे कधीही परमात्मा होऊ शकत नाहीत. परमात्म्याची खरी ओळख पटली तर आपण त्याची यथार्थ आठवण करू शकतो. परमेश्वर सर्वशक्तिमान असल्यामुळे त्याची आठवण आपल्या पूर्व कर्मांचे ओझे हलके करते. मनुष्यात्मा उन्नत होतो. खरे पुण्य त्या सर्वशक्तिमान परमेश्वराच्या आठवणीत राहून कर्म करण्यात जोडता येते. हेच आपल्या जीवनाचे उद्दीष्ट असायला हवे.

***

(पृष्ठ क्र.१९ वरुन)
करावयाचा आहे तो ईश्वरी श्रीमतानुसार करावयाचा आहे असा समर्पणभाव ज्यावेळी आपल्यामध्ये येतो तेव्हाच आपल्याला अतींद्रिय सुख मिळू लागते. आपण लवलीन अवस्थेचा अनुभव करू शकतो. महाभारतामध्ये अर्जुनाला सांगितले. तू मला शरण ये बाकी सर्व काही विसरून जा.

प्रेमपूर्ण बनणे हेच खरे, जीवनाचे सार आहे. लवलीन अवस्था आणि प्रेम पूर्ण व्यवहाराद्वारेच आपण प्रभूस प्रत्यक्ष करू शकतो. सर्वांना नि:स्वार्थ प्रेम ईश्वरी प्रेमाचा अनुभव करवू शकतो. म्हणून वर्तमान वेळी सर्व गोष्टीतून निर्विघ्न बनण्यासाठी, लवलीन स्थितीचा अनुभव करा. लवलीन राहिल्यामुळेच आपण निरंतर योगी, तीव्र पुरुषार्थी बनून कमी वेळेत भरपूर कमाई करू शकतो. म्हणून लवलीन स्थितीचा अनुभव करा.

***

(पृष्ठ क्र.२४ वरुन)
माझा आनंद शब्दात सांगणे केवळ अशक्य. बाबांना पुन्हा एकदा कोटी कोटी धन्यवाद देत ज्ञानमुरली ऐकली..

आम्ही पुन्हा त्याच सेंटरला गेलो. ग्रीटा बेनने मला सांगितले, मला दादींना घरी बोलवायचे आहे. मला तर दडपण आले. कसे काय करायचे? पण बाबांनी ग्रीटाला माध्यम बनवले, केवळ बाबांच्या मदतीने आम्ही दादींचा कार्यक्रम आखण्यात यशस्वी झालो. दीदी घरी येणार हे ठरले. मला तर आकाश ठेंगणे झाले. मग काय खूप छान त्यांच्या आगमनाची तयारी आम्ही केली. ग्रीटाने आपल्या मित्र-मैत्रिणींच्या कंपूला निमंत्रण दिले. दादी घरी येणार हा विचार मला खूप उंचावर नेऊन ठेवत होता. माझी स्थिती तर शब्दात सांगणे अशक्य. तो दिवस उजाडला. खूप मित्र-मैत्रिणी एकत्र आले. तिकडच्या लोकांना जणू पोप घरी भेटावे असे वाटले. कार्यक्रम खूपच छान झाला आणि दादींनी माझ्या डोक्यावर हात ठेऊन सगळ्यांना सांगितले ही (म्हणजे मी) आता तुमचा कोर्स करेल. सगळे कसे स्वप्नवत घडत गेले. आणि बाबांनी मला माध्यम बनवले. चमत्कार घडल्या प्रमाणे. रोज तिकडे अपॉइंटमेंट घेऊन कोर्सला भाऊ बहिणी येत राहिले. ग्रीटानेही मला पूर्ण पाठिंबा दिला. कितीही लोक आले तरी चालतील कोर्सला. तिच्या घरी मी राहत होते. तिच्या सहयोगाने बाबांच्या मदतीने, खूप सेवा झाली. मी कृतार्थ झाले.१ महिना मी तिकडे राहिले. आणि बाबा माझ्याकडून भरभरून सेवा करून घेत होते. कोर्स करून सगळेजण सेंटरला पण जाऊ लागले...किती आणि कसे आभार मानावे! मी खूप भाग्यवान. बाबांच्या आध्यात्मिक कन्या ग्रीटा आणि सगळ्या तिकडच्या अलौकिक भाऊ-बहिणींना मनापासून धन्यवाद देत मी भारतात परतले. आज इतक्या वर्षांनंतरही या आठवणी तितक्याच ताज्या आहेत. आठवणींची बकुळफुले आपल्या ओंजळीत ठेऊन इथेच लेखणी थांबवते.

***

## आम्हा प्रेरणा बाबांची

साथ आम्हाला साऱ्यांची
ब्र.कु. भाऊ बहिणींची
चला जाऊया शिव कार्याला
आम्हा प्रेरणा बाबांची

घरोघरी जाऊनी
शिवसंदेश देऊ साऱ्यांना
आम्हा प्रेरणा बाबांची

संगमयुग हे अति पावन
बाबा सांगे दुर्लभ ज्ञान
दुर्लभ हे ज्ञानामृत
दिली प्रेरणा बाबांनी

कर्माचे हे गुह्य ज्ञान
जाणुनी विश्वनाटकाचे रहस्य
दिली प्रेरणा बाबांनी

शुभ कार्याला वेळ नको
देहाभिमान नको
दिली प्रेरणा बाबांनी
साथ आम्हाला साऱ्यांची
ब्र.कु. भाऊ बहिणीची
चला जाऊया शिव कार्याला
आम्हा प्रेरणा बाबांची

**ब्र.कु. लता, देगलूर**

***




वाशी, नवी मुंबई : जागतिक मातृदिवस निमित्त कार्यक्रमात संबोधताना ब्र.कु. प्रीती, सुरज हॉस्पिटलच्या डायरेक्टर डॉ. रमा पाटील, डॉ. अलका चड्डा, ब्र.कु. शीला व ब्र.कु. शुभांगी



ठाणे (पू.) : 'ओम ध्वनी' करताना समर कॅम्पमधील मुले, मुली व ब्र.कु. मीनाक्षी




विलेपार्ले, मुंबई : ब्र.कु. दीपक यांना पुरस्कार प्रदान करताना क्रिकेटपटू ब्रेटली, सोबत ब्र.कु. प्रीती



येवळा : चित्रपट निर्माते भ्राता गोवर्धन दोलतडे, अभिनेता भ्राता रोहन पाटील, अभिनेत्री दर्शनी दाभाडे व त्यांच्या टीमचा सत्कार करताना ब्र.कु. नीता



पिंपरी, पुणे : ब्र.कु. सुरेखा यांचा ज्येष्ठ नागरिक संघातर्फे सत्कार करताना



भिलवडी, सांगली : राष्ट्रीय कृषी दिवसानिमित्त कार्यक्रमाचे उद्घाटन प्रसंगी दीप प्रज्ज्वलन करताना कृषी अधिकारी भ्राता संभाजी पटकूरे, सरपंच राजेश्वरी सावंत, ब्र.कु. मीरा व अन्य मान्यवर

Registration No. : MAHMAR/2007/21914



पांडव भवन, माउंट आबू : पिताश्री ब्रह्माबाबांच्या स्मृतीस्तंभावर स्नेह पुष्पांजली अर्पित करताना भारताच्या राष्ट्रपती माननीय द्रौपदी मुर्मू सोबत राजयोगिनी ब्र.कु. शिलू दीदी




शांतीवन, आबूरोड : राष्ट्रीय संमेलनामध्ये संबोधित करताना भारताचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदीं सोबत राजयोगिनी ब्र.कु. रतनमोहिनी दादी, राजयोगी ब्र.कु. मृत्युंजय व डॉ. प्रताप मिड्ढा